

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

विद्वान सर्वत्र पूज्यते।

स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर

पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine September 2025 - Pages - 60**

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे | कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७६ * अंक ११ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-




शुक्रवार दि. २९ ऑगस्ट २०२५ रोजी डॉ. खैरकुल गीता - निधी स्मृती व्याख्यानमाला एकोणचाळीसावे पुष्प प्रसंगी प्रमुख पाहुणे व्याख्याते मा. श्री. रासपती दास, आध्यात्मिक वक्ते आणि युवा मार्गदर्शक इस्कॉन, पुणे यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत डावीकडून
उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ,
संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, श्री. बलभद्र स्वामी,
पाठीमागे कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ आणि संचालक श्री. आनंद कुलकर्णी


## ✼ डॉ. खैरकुल गीता – निधी स्मृती व्याख्यानमाला क्षणचित्रे ✼



शिक्षणमहर्षी डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना श्री. रासपती दास समवेत संस्था पदाधिकारी आणि श्री. बलभद्र स्वामी



कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे



'आधुनिक शिक्षण आणि गीतेतील रहस्ये' या विषयावर आपले विचार मांडताना श्री. रासपती दास



उपस्थितांचे आभार मानताना कार्यवाह श्री. संजय गुंजाळ

## ✼ संस्था मुख्यालय, पुणे ✼



संस्थेच्या देणगीदार श्रीमती गीतांजली लिमये यांनी दिलेल्या देणगीच्या व्याजाचा विनियोग संस्थेच्या अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे ९ येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यासाठी करण्यात आला. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना श्रीमती गीतांजली लिमये यांचे शुभहस्ते धनादेशाचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी देणगीदार व त्यांच्या भगिनी यांच्या समवेत संस्थेचे पदाधिकारी, संचालक, प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी

संपादकीय

# ज्ञानयोगी

'तत्त्वज्ञ राजा असावा' हे पाश्चात्य विचारवंत आणि तत्त्वज्ञ असलेले प्लेटो यांचे मत डॉ. श्री. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या रूपाने साकार झाले.

डॉ. राधाकृष्णन यांच्या चरित्राचा मागोवा घेतला तर एक गोष्ट प्रकर्षाने आपल्या लक्षात येते की, ते अलौकिक प्रज्ञावंत होते.

त्या काळातील मिशनरी मंडळींनी चालवलेल्या शाळा, महाविद्यालयांमध्ये त्यांचे शिक्षण झाले. त्या सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये बायबलचे प्राबल्य प्रचंड होते. श्री. राधाकृष्णन यांनाही बायबलमधील तत्त्वज्ञान आवडत होते. पण, त्यातून कळत न कळतपणे लादला जाणारा 'भारतीय संस्कृती ही तेजोहीन' आहे हा विचार त्यांना अस्वस्थ करत होता. आपल्या स्वधर्माचा तेजोभंग होत असल्याचे विदारक चित्र त्यांना खटकत होते. त्याच सुमारास पाश्च्यात्य जगतातील स्वामी विवेकानंदांच्या विजय वार्तेने एतद्देशीयांची मने मोहरून गेली होती. त्यापैकीच एक राधाकृष्णन होते.

म्हणूनच हिंदू धर्म आणि संस्कृती यांचा तर्कशुद्ध रितीने अभ्यास करून आपल्या संस्कृती आणि तत्त्वज्ञानाचा गाभा जगापुढे मांडायचा हा त्यांनी मनोमन दृढनिर्धार केला. आपला हा हेतू साध्य करण्यासाठी त्यांनी तत्त्वज्ञान हा विषय आपल्या पदवी अभ्यासासाठी आणि व्यासंगासाठी निवडला. महाविद्यालयीन सर्व परीक्षांमध्ये ते प्रथम श्रेणीतच उत्तीर्ण होत होते. एम. ए. परीक्षेसाठी त्यांना जो प्रबंध लिहायचा होता त्यासाठी त्यांनी 'वेदान्तातील नीतीशास्त्र' हा विषय घेतला. 'वेदान्तात नीतीविचार नाही' या पाश्च्यात्यांच्या लाडक्या मताचे त्यातून खंडन करण्याचा त्यांचा विचार होता. आपल्या या स्वतंत्र विचारामुळे पाश्च्यात्य परीक्षक नाराज होतील अशी एक शंका त्यांच्या मनात डोकावत होती. परंतु राधाकृष्णन यांचे विचार आणि ज्ञान यांनी प्रभावित झालेल्या परीक्षकांनी त्यांच्या प्रबंधाचे कौतुकच केले. डॉ. ए. जी. हॉग यांनी तर, राधाकृष्णन यांचा हा प्रबंध पुस्तकरूपाने प्रकाशित करावा असा अभिप्राय दिला. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा हा पहिला ग्रंथ प्रसिध्द झाला तेव्हा, ते केवळ २० वर्षांचे होते.

पौर्वात्य आणि पाश्च्यात्य तत्त्वज्ञानाचा सर्वांगीण आणि तुलनात्मक अभ्यास करावा तसेच, आपला अभ्यास अधिकाधिक परिपूर्ण असावा म्हणून त्या काळात राधाकृष्णन यांनी अनेकानेक ग्रंथ अभ्यासिले.

आपल्याकडील प्रस्थानत्रयी, समग्र भाष्यग्रंथ, उपलब्ध दर्शनग्रंथ यांचा त्यांनी मूळापासून अभ्यास केला. तसेच पश्चिमेकडील प्लेटो, कांट, ब्रॅडले, बर्गसाँ यांच्यासह अनेकानेक विचारवंतांच्या ग्रंथसंपदेची पारायणे केली. त्याचबरोबर शेक्सपिअर, वर्डस्वर्थ, ब्राऊनिंग आणि आपल्याकडले कालीदास, भवभूती यांसारख्या अभिजात साहित्यिकांच्या कलाकृतींचेही वाचन त्यांनी रसिकतेने केले. या अभ्यासाने त्यांच्या भाषेला एक आगळेवगळे लालित्य आणि सौष्ठव प्राप्त झाले. त्यांचे विचार आणि अभिजात दर्जाची भाषा यामुळे त्यांच्या लिखाणाला एक आंतरराष्ट्रीय वाचकवर्ग लाभाला. ऑक्सफर्ड सारख्या नामवंत विद्यापीठाने त्यांच्या व्याख्यान सत्रांचे आयोजन केले. ऑक्सफर्ड विद्यापीठात राधाकृष्णन् यांच्यासाठी एक विद्यासन निर्माण करण्यात आले. राधाकृष्णन यांच्या विचार आणि भाषा सौष्ठवामुळे एकदा त्यांच्यानंतर बोलायला उभे राहिलेले इंग्लडचे पंतप्रधान अँथनी ईडन आपल्या भाषणाच्या सुरूवातीलाच म्हणून मोकळे झाले होते की, 'डॉ. राधाकृष्णन यांच्या भाषणानंतर बोलताना नांगरलेल्या शेतातून ठेचकाळत, अडखळत चालणाऱ्या बालकाप्रमाणे माझी अवस्था झाली आहे'. डॉ. राधाकृष्णन यांच्या व्यासंगामुळे त्यांची आंध्र विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यानंतर अल्प काळातच पं. मदन मोहन मालवीय यांनी त्यांना बनारस विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचीही सूत्रे स्वीकारण्याची विनंती केली. एकाच वेळी दोन विद्यापीठांचे कुलगुरूपद भूषविणारे डॉ. राधाकृष्णन आपल्याकडल्या आजपर्यंतच्या इतिहासातले एकमेवद्वितीय उदाहरण असावे. कुलगुरूपदी असूनही अनेक वर्ष त्यांनी आपले शिकवण्याचे कार्य थांबवले नव्हते. अनेक विद्यापीठातून ते त्याही काळात व्याख्याने देत.

आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर डॉ. राधाकृष्णन् यांच्यावर तत्कालीन सरकारकडून अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या होत्या. शिक्षणशास्त्रातले त्यांचे योगदान पाहून स्वातंत्र्यानंतर शिक्षणाची दिशा ठरवण्यासाठी भारत सरकारने जे आयोग स्थापन केले होते त्यातला एक आयोग राधाकृष्णन यांच्या देखरेखीखाली नेमण्यात आला होता.

केवळ पुस्तकी पंडित न होता विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व्हावा या हेतूने शिक्षण अधिकाधिक सकस कसे करता येईल त्या संदर्भात राधाकृष्णन यांनी अनेक ठोस सूचना केल्या होत्या. त्यात विद्यार्थ्यांची वर्गातील संख्या, शिक्षकांची पात्रता, शिक्षण संस्थांबाबतची सरकारची जबाबदारी, समाजाचे उत्तरदायित्व आदी अनेक प्रश्नांचा साकल्याने विचार करून त्यावर प्रभावी उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

श्री. राधाकृष्णन यांची भारताचे रशियातील राजदूत म्हणूनही नेमणूक करण्यात आली होती. तिथेही त्यांनी आपल्या देशाची सांस्कृतिक आणि वैचारिक महत्तता मोठ्या समर्थपणे मांडली होती. स्टॅलिन आणि त्यांचे अगदी जिवाभावाचे संबंध होते म्हणूनच राधाकृष्णन यांची कारकीर्द संपल्यावर त्यांना निरोप देताना स्टॅलिन म्हणाले होते, 'तुम्ही एक पहिली अशी व्यक्ती आहात की, जिने मला एक माणूस म्हणून वागवले. तुम्ही सोडून जाताय याचे मला दुःख होत आहे. तुम्हाला दीर्घायुष्य लाभो.' काही काळानंतर १९५२ ते ६२ या कालखंडात ते भारताचे उपराष्ट्रपती होते. पुढे १९६२ मध्ये ते राष्ट्रपती झाले. राजकारणाच्या धकाधकीत असूनसुध्दा त्यांचे ग्रंथलेखन कार्य थांबले नव्हते. अनेक तत्त्वज्ञानपर ग्रंथ त्यांनी लिहिले. आपल्या लिखाणात त्यांनी एके ठिकाणी धर्माची सुटसुटीत व्याख्या करताना म्हटले आहे, 'आपल्या ठायी असणाऱ्या दिव्यत्वाच्या प्रकटी करणासाठी आपल्या आचार - विचारात माणूस विशिष्ट मार्गाने बदल घडवून आणतो. हा मार्ग म्हणजेच धर्म होय.'

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या लिखाणात आपल्याला ठिकठिकाणी सुभाषितवजा वाक्यं आढळतात. त्यातून त्यांचे मूलगामी विचार आपल्या लक्षात येतात. ते म्हणतात,

'Graduation is merely a milestone in the journey of life.'

'Each age has its faith and our age is committed to Science.'

एकदा त्यांना श्रोत्यांकडून प्रश्न विचारण्यात आला की,

'What is the difference between the School Master and a Station Master.'


राधाकृष्णन क्षणाचाही विलंब न लावता उत्तरले होते,

'A School Master trains the mind and a Station Master minds the train.'

या त्यांच्या भाषा पांडित्यावरून आपल्या लक्षात येते की, तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने ते रुक्ष किंवा तर्ककर्कश झाले नव्हते.

राधाकृष्णन हे मूलतः एक तत्त्वज्ञान असल्याने मानवी जीवनातील समस्यांची उत्तरे शोधत जीवन अधिकाधिक परिपूर्ण करण्याचे मार्ग त्यांनी शोधले. श्री. राधाकृष्णन यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याचा गौरव म्हणून ५ सप्टेंबर या त्यांच्या जन्मदिनी आपण शिक्षकदिन साजरा करतो. श्री. राधाकृष्णन यांच्या योगदानाचा हा यथोचित गौरवच आहे. अशा सरस्वती पुत्रास मनापासून वंदन.

**सर्व गुरूजनांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा.**



दि. २७ ऑगस्ट २०२५
श्री गणेश चतुर्थी

# डॉ. खैरकुल गीता - निधी स्मृती व्याख्यानमाला एकोणचाळीसावे पुष्प - प्रमुख वक्ते श्री. रासपती दास

कोषाध्यक्ष - श्री. कृष्णाजी कुलकर्णी



कै. डॉ. ग. श्री. खैर

दि. २९ ऑगस्ट २०२५ रोजी गीता महर्षी गुरूवर्य कै. श्री. ग. तथा अण्णासाहेब खैर यांच्या ३९ व्या स्मृतीदिनानिमित्त संस्थेच्या दादासाहेब केतकर सभागृहामध्ये आयोजित केलेल्या डॉ. खैरकुल गीता - निधी स्मृती व्याख्यानमाला एकोणचाळीसावे पुष्प गुंफण्यासाठी श्री. रासपती दास, आध्यात्मिक वक्ते आणि युवा मार्गदर्शक, इस्कॉन, पुणे यांना आमंत्रित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरूवातीस कै. श्री. ग. तथा अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमेस श्री. रासपती दास यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. मुक्तांगण इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ईशस्तवन आणि ''पुण्य नगरीचे विद्यार्थी गृह शताब्दीचा सन्मान'' हे संस्थेचे ''गौरव गान'' सादर केले.

कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले व प्रास्ताविकात गीता महर्षी गुरूवर्य कै. अण्णासाहेब खैर यांचे शैक्षणिक व गीता प्रसारासाठी केलेल्या कार्याची व कै. अण्णांच्या जीवनातील अनेक महत्त्वाच्या घटनांची माहिती दिली. लहानपणीच वडिलांचे छत्र हरपले असताना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये घेतलेले शालेय शिक्षण, त्यांनंतर परदेशात जाऊन एम. ए., पीएच.डी. चे शिक्षण घेतले. तसेच जर्मनी, फ्रान्स, रशिया, जपान, आदी देशांना भेटी देऊन तेथील शिक्षण पध्दतींचा अभ्यास करून त्या शिक्षण पध्दती भारतात आपल्या संस्थेत कशा आणता येथील याचा अभ्यास केला आणि अंमलात आणल्या. गीता प्रसारासाठी केलेले लेखन, त्यांनी विद्यार्थ्यांसाठी लिहिलेली विविध संस्कारक्षम पुस्तके आणि गीता प्रसारासाठी केलेल्या कार्याविषयी उपस्थितांना माहिती दिली. संस्थेच्या सुरूवातीच्या काळात कै. अण्णासाहेब खैर यांच्यासारखे नेतृत्व संस्थेस लाभले त्यामुळे संस्थेची जडणघडण होऊन संस्था शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षाकडे वाटचाल करत आहे असे अत्यंत अभिमानाने सांगितले. तसेच संस्थेचे विद्यमान संचालक मंडळ सुध्दा कै. अण्णांच्या विचारांचा वारसा घेऊनच संस्थेच्या विकासासाठी प्रयत्न करीत असल्याचे नमूद केले.

व्याख्यानमालेचे वक्ते श्री. रासपती दास यांचा परिचय अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे ९ येथील प्राध्यापिका व विभाग प्रमुख डॉ. सौ. मीनाक्षी अत्रे यांनी करून दिला. श्री. रासपती दास यांचे शालेय शिक्षण ज्ञान प्रबोधिनी आणि महाविद्यालयीन शिक्षण पी. आय. सी. टी. अशा नामांकित शैक्षणिक संस्थांमधून झाले आहे. तरुण वयातच इस्कॉन सारख्या संस्थेच्या माध्यमातून गीता - प्रसारासाठी करीत असलेले कार्य व संपूर्ण भारत व अनेक देशांमध्ये दिलेल्या व्याख्यांनाची माहिती त्यांनी दिली. त्यानंतर कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते श्री. रासपती दास यांचा सत्कार, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला.

श्री. रासपती दास यांनी ''आधुनिक शिक्षण आणि गीतेतील रहस्ये'' हा विषय प्रोजेक्टरद्वारे स्लाईड शोच्या माध्यमातून श्रोत्यांना अतिशय सोप्या व रंजक पध्दतीने समजावून सांगितला. भगव्या वस्त्रातील एक युवक - श्री. रासपती दास यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय तेजस्वी होते. सुमारे ६० मिनिटे श्रोते अतिशय मंत्रमुग्ध होऊन श्रवण करीत होते. त्यांच्या प्रत्येक वाक्यामध्ये त्यांनी घेतलेल्या उच्च शिक्षणाचा व गीतेवर केलेल्या सखोल अभ्यासाचा प्रत्यय येत होता.

व्याख्यानाच्या सुरूवातीलाच आजच्या वेगवान व तंत्रज्ञानाच्या आणि मोबाईलच्या अति वापरामुळे भारतातील तरुणांच्या आयुष्यावर होणाऱ्या भीषण परिणामांची माहिती आकडेवारीसह स्पष्ट केली. यामध्ये तरुणपिढीवर होणाऱ्या मानसिकदृष्ट्या कमकुवतपणा, नैराश्य, निद्रानाश, कौटुंबिक समस्या अशा गंभीर परिणांमुळे वर्षाला एकूण १३,००० तरुण आत्महत्या करीत असल्याचे सांगितले.

आधुनिक शिक्षण घेत असताना केवळ क्रमिक पुस्तकांचा अभ्यास न करता त्या सोबत जीवनातील खरी मूल्ये, संस्कार, संस्कृती यांचे ज्ञान गीतेसारख्या ग्रंथामधून विद्यार्थ्यांना देणे गरजेचे असल्याचे आवर्जून सांगितले. त्यासाठी जगामध्ये असलेल्या सर्व समस्यांची, योगमहर्षी ऋषी पतंजली यांनी सांगितेल्या पाच प्रमुख कारणे अविद्या, अस्मिता, राग, द्वेष, अभिनिवेश या पाच मानवी भावनांशी निगडीत असल्याचे उपस्थितांना पटवून दिले.

तसेच गीतेमधील विविध श्लोकांचा अर्थ समजावून सांगताना ज्ञान घेत असताना नम्रतेचा अंगीकार करून, सत्याचा स्वीकार करून, फळाची अपेक्षा न करता कर्म करीत राहिल्याने व विविध क्षेत्रात काम करीत असताना महत्त्वाकांक्षा बाळगताना सर्व समाजाच्या कल्याणाचा विचार करून सर्व प्रकारची शक्ती ताकद प्राप्त करताना दृढता व सहनशीलता या गुणांचा अंगीकार केल्यास सर्व प्रकारच्या मानवी समस्यांवर मात करता येईल व यामध्ये मानवाचे कल्याण व सौख्य सामावले असल्याचेही सांगितले.

कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी श्री. रासपती दास यांचे, तसेच सर्व उपस्थितांचे आभार मानले. श्री. रासपती दास यांनी मांडलेल्या विविध विचारांचा उहापोह करून ते विचार सर्वांसाठी अतिशय उद्‌बोधक व मार्गदर्शक असल्याचे आवर्जून सांगितले. उपस्थित सर्वांना त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामध्येही याचा निश्चितच लाभ होईल असे सांगितले.

या कार्यक्रमास संस्थेच्या पुणे, नाशिक, मुंबई, नवी मुंबई येथील पदाधिकारी, संचालक, गुरूवर्य कै. डॉ. अण्णासाहेब खैर आणि कुलगुरू कै. दादासाहेब केतकर यांचे कुटुंबिय, देणगीदार, हितचिंतक, शतायुभवन सदस्य, संस्थेच्या विविध विभागांचे प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. माणिक जोशी, शिक्षिका, मुक्तांगण इंग्लिश स्कूल यांनी केले. कु. वैष्णवी उदावंत, शिक्षिका मुक्तांगण इंग्लिश स्कूल यांनी गायलेल्या सुरेल पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

ईस्कॉन, पुणे यांचेतर्फे सर्व उपस्थितांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. ***

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : श्री. व्ही. पी. गावडे**

## लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी आणि लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती संपन्न

शुक्रवार दि. १ ऑगस्ट २०२५ रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी आणि लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीस प्राचार्य व्ही. पी. गावडे यांच्या हस्ते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि लोकशाहीर आण्णाभाऊ साठे या दोघांच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यानंतर ईशस्वतन सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी केले. इ. ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली. अध्यापिका सौ. सुजाता व्हनमाने आणि अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या कार्याविषयी तसेच अध्यापिका श्रीमती वैशाली मोघे यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. प्राचार्य व्ही. पी. गावडे यांनीही आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या विषयी माहिती दिली. अध्यापिका सौ. प्राजक्ता चोपडे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. या प्रसंगी सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### राखीपौर्णिमा

शुक्रवार दि. ८ ऑगस्ट २०२५ रोजी राखीपौर्णिमा हा सण उत्साहात साजरा करण्यात आला. इ. ५ वी ते इ. १० वी च्या विद्यार्थिनींनी आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांना राखी बांधली. या प्रसंगी सर्व वर्गशिक्षकांनी प्रशालेतील विद्यार्थ्यांना राखीपौर्णिमेचे महत्त्व सांगितले.

### संस्कृत दिन

सोमवार दि. ११ ऑगस्ट २०२५ रोजी संस्कृत दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी अध्यापिका श्रीमती वैशाली मोघे यांनी इ. ५ वी ते इ. १० वी च्या विद्यार्थ्यांना संस्कृत दिनाचे महत्त्व, संस्कृत भाषेचे महत्त्व व संस्कृत भाषेचे व्याकरणकर्ता पाणिनी यांची कथा सांगितली. तसेच विद्यार्थ्यांना संस्कृत प्रहेलिका, एका सुभाषिताचे दोन अर्थ असणारी सुभाषिते सांगितली.

### स्वातंत्र्यदिन

शासन आदेशानुसार 'हर घर तिरंगा' या शासनाच्या उपक्रमांतर्गत बुधवार दि. १३ ऑगस्ट २०२५ रोजी प्राचार्य श्री. व्ही. पी. गावडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. या दिवशी इ. ५ वी ते इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. तसेच या दिवशी भारतीय जनता पक्षाचे आमदार श्री. हेमंत रासने यांनी शासनाच्या 'हर घर तिरंगा' या उपक्रमातंर्गत आयोजित केलेल्या रॅलीमध्ये प्रशालेतील इ. ५ वी ते इ. १० वीचे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले. प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी हातामध्ये तिरंगा घेऊन स्वातंत्र्यदिनाबद्दल घोषणा दिल्या.

गुरुवार दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी इ. ६ वी व इ. ७ वीच्या विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर केले.

शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी आपल्या भारत देशाचा ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दि न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीचे निवृत्त सहाय्यक व्यवस्थापक

मा. श्री. चंद्रकांत निंबाळकर तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष संचालक डॉ. राजेंद्र कांबळे हे उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे मा. श्री. चंद्रकांत निंबाळकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर ध्वजवंदन करण्यात आले. राष्ट्रगीत व राज्यगीत सादर करण्यात आले. प्रशालेच्या एन. सी. सी. छात्रांनी राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. अध्यापक श्री. प्रशांत बोंबलट यांनी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्याकडून ध्वजप्रतिज्ञा म्हणवून घेतली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अतिथींचे स्वागत प्राचार्य श्री. व्ही. पी. गावडे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. अपर्णा भरगुडे यांनी करून दिला. संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि स्मृतीचिन्ह देऊन करण्यात आला. तसेच संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, संचालक श्री. रमेश कुलकर्णी, महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्थेचे प्राचार्य पी. व्ही. शिंदे, शिशुनिकेतन मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे, मुक्तांगण इंग्लिश स्कूल सदाशिव पेठ शाखा माध्यमिक विभाग मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक आणि प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे, संस्थेच्या अनुसंधान समितीचे सदस्य श्री. हणमंत भोसले, विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरुळ शाखेचे माजी प्राचार्य श्री. भीमराव आडसूळ या सर्वांचा सत्कार प्राचार्य व्ही. पी. गावडे यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन करण्यात आला.

या शुभदिनी प्रमुख पाहुणे श्री. चंद्रकांत निंबाळकर यांनी तसेच संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी फलक लेखन केले. अध्यापक श्री. विठ्ठल अनभुले यांनी कार्यक्रम पत्रिका तयार केली. कार्यक्रमाची सांगता वंदेमातरम या राष्ट्रगीताने करण्यात आली. या प्रसंगी संस्थेच्या विविध विभागांचे प्राचार्य, मुख्याध्यापिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

शासनाच्या आदेशानुसार स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने अध्यापक व एन. सी. सी. विभाग प्रमुख श्री. प्रशांत बोंबलट यांनी इ. ५ वी ते इ. १० वी च्या विद्यार्थ्यांकडून कवायत संचलन करवून घेतले. सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

***

## * महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे *



दि. १५ ऑगस्ट २०२५ स्वातंत्र्यदिनी प्रमुख पाहुणे मा. श्री. चंद्रकांत निंबाळकर यांचा सत्कार करताना संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, समवेत अनुसंधान समिती सदस्य श्री. हणमंत भोसले आणि प्राचार्य श्री. व्ही. पी. गावडे

# मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा, पुणे ३०

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**

**मुख्याध्यापिका : सौ. शिल्पा चितारे (प्राथमिक)**

**मुख्याध्यापिका : सौ. मनीषा नाईक (माध्यमिक)**

### अभिनंदनीय

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, पुणेच्या पुणे शहर महिला शहराध्यक्ष म्हणून शिक्षिका सौ. प्राजक्ता प्रशांत मुरमट्टी यांची दि. ३१.१२.२०२८ पर्यंत नियुक्ती करण्यात आली. सदर नियुक्तीचे पत्र परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. शरद गोरे आणि उपाध्यक्ष शुभांगी ताई काळभोर यांनी सुपूर्द केले.

**सौ. प्राजक्ता मुरमट्टी यांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

### आर्यभट्ट मेन्स स्कॉलरशिप परीक्षा - बक्षीस वितरण समारंभ २०२४-२५

ज्योतिर्मय शिक्षण संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्या मार्फत आयोजित केलेल्या आर्यभट्ट मेन्स स्कॉलरशिप परीक्षेचा बक्षीस वितरण समारंभ दि. ३१ जुलै २०२५ रोजी पार पडला. याप्रसंगी कार्यक्रमाचे आयोजक सौ. सारिका शेंडे आणि श्री. महांतेश नाईक, प्रमुख पाहुणे शिक्षणतज्ज्ञ डॉ. अ. ल देशमुख, श्री. किशोर बोरसे, जेष्ठ सचिव, मुख्याध्यापक संघ व शिक्षणतज्ज्ञ डॉ. रेणू पाटील उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षीसांचे वितरण करण्यात आले. स्कॉलरशिप विजते विद्यार्थी पुढील प्रमाणे -

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|
| कु. आसावरी आशिष मोरे | २ री |
| कु. आयुष जयदीप भारणे | ४ थी |
| कु. सारंग नीलम पोटे | ५वी |
| कु. रुद्र रणजीत भोंडवे | ८ वी |

***

**✻ मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा, पुणे ✻**



आर्यभट्ट मेन्स स्कॉलरशिप विजेत्या विद्यार्थ्यांसमवेत पर्यवेक्षिका मधुमती कदम आणि शिक्षक प्रतिनिधी शुभांगी भालगरे

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९

**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**प्राचार्या : सौ. सुप्रिया देशकुलकर्णी**
**मुख्याध्यापिका : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

### नागपंचमी

मंगळवार दि. २९ जुलै २०२५ रोजी नागपंचमीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना नागपंचमीचे महत्त्व सांगितले. तसेच शाडू मातीपासून केलेल्या नागोबाची पूजा करून लाह्यांचा नैवेद्य दाखविला. शिशु गटातील मुलांनी मातीचा नागोबा केला. छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी कागदी नागोबा करून वहीत चिकटवला. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी कागदाच्या नागोबावर बोटांचे ठसे घेतले. सर्व विद्यार्थी पारंपरिक महाराष्ट्रीयन कपडे घालून आले होते. विद्यार्थिनींनी हातावर मेंदी काढली होती.

### महिना अखेर उपक्रम

गुरुवार दि. ३१ जुलै २०२५ रोजी महिना अखेर उपक्रमांतर्गत सर्व विद्यार्थी नवीन कपडे घालून आले होते. या दिवशी शिशु गटातील विद्यार्थ्यांनी छत्रीच्या आकारात रंग भरून आईस क्रीमच्या काडीला ती चिकटविली. छोट्या गटातील मुलांनी कागदी चेरी बनवून ती कागदावर चिकटविली. तर मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी माशाचे चित्र रंगवून ते चिकटवले.

### रक्षाबंधन

शुक्रवार दि. ८ ऑगस्ट २०२५ रोजी रक्षाबंधनाचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी एक एक छोटी राखी आणली होती. ती राखी शिक्षकांनी त्यांना बांधली. शिशु गटातील विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या वहीमध्ये राखी चिकटविली. छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी पुस्तकातील राखी चे चित्र रंगविले व राखी चिकटविली. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी राखीचे चित्र काढून ते सुंदर रितीने रंगविले. या दिवशी सर्व विद्यार्थ्यांनी डब्यात नारळापासून तयार केलेले पदार्थ आणले होते.

### स्वातंत्र्य दिन

गुरुवार दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी सर्व विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिन साजरा केला. शिशु गटातील विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या वहीत आकाशाचे चित्र रंगवून झेंडा चिकटवला. छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी पुस्तकातील झेंड्याच्या चित्रात सुंदर रंग भरले. तर मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या वहीत झेंड्याचे चित्र काढून ते छान रंगविले.

शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५ शाळेमध्ये साजरा झालेल्या झेंडा वंदनाच्या कार्यक्रमात उपस्थित प्रमुख पाहुणे व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी गुलाबाचे फूल देऊन केले.

### गोपाळकाला

सोमवार दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी गोपाळकाला मोठ्या उत्साहात साजरा झाला. सर्व विद्यार्थी कृष्ण, राधा आणि गोप-गोपी बनून आले होते. शाळेत दहीहंडी बांधण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी दहीहंडीच्या गाण्यांवर नृत्य केले. त्यानंतर हंडी फोडण्यात आली. यावेळी शिशु गटातील विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या वहीत कागदापासून केलेले मोरपीस चिकटवले. छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी पुस्तकात हंडीचे कट आउट चिकटवले. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या वहीत हंडी व बासरीचे चित्र काढून ते रंगविले. या दिवशी सर्व विद्यार्थ्यांनी डब्यात दही पोहे, गोपाळकाला असे पदार्थ आणले होते.

## प्राथमिक विभाग

### अबॅकस वर्ग

दि. १९ जुलै २०२५ रोजी अबॅकस हे गणिती क्रिया शिकण्यासाठी तसेच स्मरणशक्ती, एकाग्रता आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी एस. आय. पी.

अकॅडमी व शाळेच्या संयुक्त विद्यमाने इ. २री व ३ रीच्या विद्यार्थ्यांसाठी अबॅकस वर्ग सुरू करण्यात आले.

### बुध्दीबळ स्पर्धेचे आयोजन

दि. २१ जुलै २०२५ रोजी शाळेच्या आणि जे. के. ज. एक्सेलन्स चेस ॲकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने, विद्यार्थ्यांना बुध्दीबळ खेळण्यास प्रोत्साहन देण्यासाठी जागतिक बुध्दीबळ दिनाचे औचित्य साधून शाळेच्या क्रीडाभवनात आंतर ॲकॅडमी बुध्दीबळ स्पर्धा - २०२५ यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली. या स्पर्धेमध्ये शाळा आणि ॲकॅडमीचे एकूण १०४ खेळाडू सहभागी झाले होते. प्रत्येक गटातील पहिले तीन क्रमांक मिळविणाऱ्या स्पर्धकांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमाला आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ बुध्दीबळपटू मा. चंद्रकांत डोंगरे, मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली, उच्च न्यायालयाचे वकील, इन्फो-डॅड प्रायव्हेट लिमिटेड व विश्वानाथ फाउंडेशनचे संस्थापक आणि दैनिक शिवजागरचे मुख्य संपादक ॲड. शंकर चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभ दिमाखात पार पडला.

### स्मार्ट फोनिक्स वर्ग सुरू

दि. २७ जुलै २०२५ रोजी मुलांच्या शिकण्याच्या प्रवासात स्मार्ट फोनिक्सचे महत्त्व जाणून प्रभावी शिक्षण मिळावे, यासाठी स्मार्ट फोनिक्स वर्ग सुरू करण्यात आले. या वर्गाला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### स्वातंत्र्य दिन सोहळा

दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रम प्रसंगी वायुदलातील ग्रुप कॅप्टन श्री. अनंत बेवूर व सौ. विनिता बेवूर प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पर्यवेक्षिका सौ. शिरीन अकोलावाला यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली यांनी स्वागतपर भाषण केले. उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. सौ. विनिता बेवूर यांच्या हस्ते निवृत्त शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांचे समूह गान व भाषणे झाली. कार्यक्रमाच्या शेवटी प्रमुख पाहुण्यांनी सर्वांना संबोधित केले. याप्रसंगी संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका, शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

### अभिनंदनीय

* पुणे जिल्हा कराटे स्पर्धेत कु. अर्चित मुळीक इ. ३री क याने सहभाग घेतला होता. या स्पर्धेत त्याने एक सुवर्ण आणि एक ब्राँझ अशी दोन पदके जिंकली.

* ओकिनावा मार्शल आर्ट्स अकॅडमीतर्फे आयोजित राष्ट्रीय कराटे स्पर्धेत कु. अवधूत कुलकर्णी इ. ३री क सहभागी झाला होता. त्याने ब्राँझपदक पटकावले.

## माध्यमिक विभाग

### इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा

दि. १७ जुलै २०२५ रोजी इ. ७ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे

**लहान गट ( इ ७ वी आणि ८ वी)**

| विद्यार्थ्याचे नाव | इ / तु | क्रमांक |
|---|---|---|
| कु. स्वरा घोडके | ८ वी ब | प्रथम |
| कु. अनघा शिंदे | ७ वी इ | द्वितीय |
| कु. सर्वज्ञा जाधव | ७ वी ब | तृतीय |

**मोठा गट (इ. ९ वी आणि १०वी)**

| | | |
|---|---|---|
| कु. श्रावणी साळुंखे | ९ वी अ | प्रथम |
| कु. पृथा हुंडेकरी | ९वी ब | द्वितीय |
| कु. भूमी देशपांडे | १० वी अ | तृतीय |

या स्पर्धेसाठी सौ. वैष्णवी साळवेकर आणि शिक्षिका सौ. कुमुदिनी पवार यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

### हिंदी पोस्टर मेकिंग स्पर्धा

दि. २४ जुलै २०२५ रोजी इ. ७ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांकरता हिंदी घोषवाक्य लिहिणे स्पर्धा आयोजित

करण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे

**लहान गट ( इ. ७वी आणि८ वी)**

| **विद्यार्थ्याचे नाव** | **इ / तु** | **क्रमांक** |
|---|---|---|
| कु. सिया मिसाळ | ८ वी ड | प्रथम |
| कु. योगेश निंबाळकर | ८ वी ड | द्वितीय |
| कु. आर्या शिंदे | ७ वी इ | तृतीय |

**मोठा गट (इ. ९ वी आणि १०वी)**

| | | |
|---|---|---|
| कु. रुद्र जाधव | १०वी क | प्रथम |
| कु. रुद्र को डोळे | ९ वी ब | द्वितीय |
| कु. आर्या कुंभार | ९ वी इ | तृतीय |

या स्पर्धेसाठी प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी आणि शिक्षिका सौ. सीमा जोशी यांनी परीक्षकाचे काम पाहिले.

शाळेतील एन. सी. सी. एअर विंग कॅडेट्स शिक्षिका सौ. श्रुती कांबळे यांच्यासह एन.सी.सी.ग्रुप हेडक्वार्टर, पुणे येथे ट्रेनिंग कॅम्पसाठी गेले होते. हे प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल या कॅडेट्सचा प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांच्या हस्ते चषक आणि पदक देऊन गौरव करण्यात आला. तसेच सौ. श्रुती कांबळे यांना थर्ड ऑफिसरचे प्रशस्तिपत्रक आणि सौ. अनिता गायगोळे यांना फर्स्ट ऑफिसरचे प्रशस्तिपत्रक देण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी २०२४ या शैक्षणिक वर्षात दिलेल्या वेगवेगळ्या ऑलिंपियाड परीक्षेमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना देखील प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांच्या हस्ते पदक आणि प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. यावेळी डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत शाळेच्या ज्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता त्यांचे देखील प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी कौतुक केले.

**इंटर क्लबचा उद्‌घाटन सोहळा**

दि. २६ जुलै २०२५ रोजी इंटर क्लबचा उद्‌घाटन सोहळा पार पडला यावेळी रोटरियन सौ. स्मिता विखानकर या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. रोटरियन श्री. अजय काळे यांनी प्राचार्यांचा सत्कार केला. श्री. कलेश नेरुरकर यांनी रोटरी क्लबची विस्तृत माहिती दिली. प्रमुख पाहुण्यांनी आकर्षक संवादात्मक भाषण दिले.

**भाषा अकादमीचे उद्‌घाटन**

दि. २७ जुलै २०२५ रोजी कुलगुरू दादासाहेब केतकर सभागृहात भाषा अकादमीचे उद्‌घाटन करण्यात आले. भाषा अकादमीच्या सहसंस्थापिका आणि संचालिका सौ. प्रीती गायतोंडे आणि प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांच्या हस्ते हा उद्‌घाटन सोहळा पार पडला. सौ. प्रीती गायतोंडे यांनी संपूर्ण टीमसह विद्यार्थी, पालकांशी संवाद साधत परकीय भाषा विशेषतः जर्मन व फ्रेंच भाषेचे महत्त्व पटवून दिले. पर्यवेक्षिका सौ. विजया काळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

**कारगिल दिवस उत्साहात संपन्न**

फर्ग्युसन महाविद्यालयात साजरा झालेल्या कारगिल विजय दिवसासाठी एन.सी.सी.आर्मी आणि एअर विंगचे इ. ८ वी आणि ९ वीचे कॅडेट्स उपस्थित राहिले होते.

**ओपन डायस उपक्रम**

दि. २६जुलै २०२५ रोजी शाळेत कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. शिक्षिका सौ. श्रुती कांबळे यांनी हा दिवस आपण का साजरा करतो आणि त्याचे महत्त्व काय हे सविस्तर सांगितले. कु. तन्मय इनामदार आणि कु. सानवी जाधव या इ. ८वी ब मधील विद्यार्थ्यांनी कविता सादर केली. सौ. तन्मया सहस्त्रबुद्धे, सौ. श्रद्धा लाळे या शिक्षिकांनी 'कारगिल युद्धातील महिलांची कामगिरी' तसेच 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये सहभागी असलेल्या महिलांची कामगिरी या विषयी माहिती दिली. त्यानंतर शाळेतील गायन शिक्षिका कु. वैष्णवी उदावंत यांनी 'ए मेरे वतन के लोगो' हे देशभक्तीपर गीत सादर केले. ***

# कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी आणि मॅनेजमेंट, पुणे ९

**संचालक : श्री. सुनील रेडेकर**
**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**
**प्र. प्राचार्य : डॉ. मनोज तारांबळे**

## ई अँड टी सी इंजिनिअरिंग विभाग

### शैक्षणिक सहलीचे आयोजन

दि. २३ आणि २४ जुलै २०२५ रोजी द्वितीय वर्षाच्या दोन्ही विभागांसाठी टेक्नोफोर इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि., पुणे येथे औद्योगिक शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीचा उद्देश विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक्सच्या औद्योगिक अनुप्रयोगांचे प्रत्यक्ष ज्ञान मिळावे हा होता. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी आधुनिक उत्पादन प्रणालींमध्ये ॲनालॉग व डिजिटल इलेक्ट्रॉनिक्सच्या एकत्रीकरणाबाबत महत्त्वपूर्ण माहिती आत्मसात केली.

### प्रात्यक्षिक प्रशिक्षण सत्राचे आयोजन

विभागाने IEI Student Chapter यांच्या सहकार्याने अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी दि. २५ ते २७ जुलै २०२५ या कालावधीत LabVIEW आणि NI my RIO वरील प्रात्यक्षिक प्रशिक्षण सत्राचे आयोजन केले होते. या प्रशिक्षणाचा उद्देश ग्राफिकल प्रोग्रॅमिंग व एम्बेडेड सिस्टीम डिझाइन या क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक ज्ञान वृद्धिंगत करणे हा होता. हे सत्र ऑनवर्ड टेक्नॉलॉजीज, पुणे येथील श्री. गोविंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. प्रशिक्षण सत्राचे समन्वय प्रा. वैशाली गोंगाणे यांनी केले. या प्रशिक्षण सत्रास ६० विद्यार्थी उपस्थित होते.

### हॅन्ड्स-ऑन ड्रोन वर्कशॉपचे आयोजन

IEI Student Chapter व विभागा तर्फे ‘हॅन्ड्स-ऑन ड्रोन’ वर्कशॉप दोन बॅचेसमध्ये घेण्यात आले. तिसऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी दि. ३१ जुलै व ४ ऑगस्ट २०२५ रोजी, तर दुसऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी दि. ११ ते १३ ऑगस्ट २०२५ रोजी हे वर्कशॉप घेण्यात आले. या उपक्रमात एकूण १२७ विद्यार्थ्यांनी (तृतीय वर्षातील ७३ विद्यार्थी व द्वितीय वर्षातील ५४ विद्यार्थी) उत्साहपूर्ण सहभाग घेतला. या वर्कशॉपमध्ये ड्रोनचे प्रकार, हार्डवेअर, सेन्सर्स, फ्लाइट डायनॅमिक्स, सॉफ्टवेअर इंटरफेसिंग तसेच DGCA नियमांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष ड्रोन असेंब्ली, सेन्सर व रेडिओ कॅलिब्रेशन करून स्वतः तयार केलेले ड्रोन टेस्ट फ्लाइटद्वारे यशस्वीरित्या उडवले. वर्कशॉपचे मार्गदर्शन श्री. धरमवीर सिंह व श्री. चिराग वर्मा (ड्रोन टेक्नॉलॉजी स्टार्टअपचे संस्थापक) यांनी केले. या यशस्वी आयोजनासाठी फॅकल्टी कोऑर्डिनेटर डॉ. वाय. बी. ठाकरे व प्रा. दीप्ती वरपे तसेच विभागप्रमुख डॉ. पी. जी. शेटे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

### स्टुडंट असोसिएशनचे उद्घाटन

दि. ११ ऑगस्ट २०२५ रोजी टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशन चा उद्घाटन समारंभ आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी प्रतिष्ठित पाहुणे माजी विद्यार्थी श्री. जयवंत देशपांडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन संचालक आणि माजी अध्यक्ष श्री. सुनील रेडेकर, संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर आणि प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी ‘आर्टिफिशियल इंटेलिजन्स या क्षेत्रातील संधी’ या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संयोजन प्रा. सौ. प्रिया देशपांडे आणि प्रा. निलेश कुचेकर यांनी आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी केले. या कार्यक्रमासाठी विभागप्रमुख डॉ. प्रसन्न शेटे यांनी मार्गदर्शन केले.

### एनपीटीईएल लॅब ओरिएंटेशन प्रोग्रॅम यशस्वीरित्या पूर्ण

विभागाच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी आयआयटी मुंबई येथे आयोजित एनपीटीईएल लॅब ओरिएंटेशन प्रोग्रॅम यशस्वीरित्या पूर्ण केला. हा १५ दिवसांचा प्रत्यक्ष प्रशिक्षण कार्यक्रम विद्यार्थ्यांना प्रगत

प्रयोगशाळा तंत्रांचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी आणि तांत्रिक कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी राबविण्यात आला होता. विद्यार्थ्यांना सेमिकंडक्टर डिव्हाइसेस व NgSpice सिम्युलेशन या दोन विषयांवर प्रशिक्षण घेतले. सहभागी विद्यार्थ्यांना एनपीटीईएल लॅब ओरिएंटेशन प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे आणि विभागप्रमुख डॉ. पी. जी. शेटे यांनी अभिनंदन केले व त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करून भविष्यात शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात अधिक यश संपादन करण्याचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना अशी प्रतिष्ठित संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल महाविद्यालयाचे व्यवस्थापन, संचालक मंडळ, प्राचार्य, विभागप्रमुख व ईटीसी विभाग यांचे विशेष आभार मानण्यात आले.

### मॉडेल युनायटेड नेशन्सचे आयोजन

दि. १५ ऑगस्ट २०२५ महाविद्यालयातील लक्ष्य ॲस्पिरंट्स क्लब तर्फे ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त महाविद्यालयांतर्गत मॉडेल युनायटेड नेशन्सचे म्हणजेच (MUN) चे आयोजन करण्यात आले. विद्यार्थीच या उपक्रमात विविध देशांचे प्रतिनिधित्व करणारे ४२ प्रतिनिधी म्हणून सहभागी झाले. यामध्ये UNHRC परिषद निवडली गेली. या परिषदेचा विषय ''प्रमुख अर्थव्यवस्थांतील शैक्षणिक व कार्यसंस्थांमध्ये होणारा मानवाधिकार भंग आणि व्यवस्थात्मक वर्णद्वेष'' हा होता. प्रतिनिधींनी संरचित चर्चासत्रे, कौकस आणि सहकार्याच्या माध्यमातून सखोल चर्चा केली. परिणामी दोन ठराव बहुमताने मंजूर करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अजिंक्य पुंडलिक यांनी भूषविले, तर रुद्राक्ष शेटे आणि आर्यन परिहार यांनी सह-अध्यक्ष म्हणून सहाय्य केले. विजेत्यांमध्ये तेजस रेठारेकर (यूके) प्रथम क्रमांक, कार्तिक बोडके (दक्षिण आफ्रिका) द्वितीय, प्रसाद सराटकर (यूएसए) तृतीय क्रमांक मिळवला. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्र. प्राचार्य डॉ. मनोज तरांबळे आणि ईटीसी विभागप्रमुख प्रा. डॉ. पी.जी. शेटे यांच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. समारोप सत्रात प्रमाणपत्रांचे वितरण प्रा. आनंद नजन यांनी केले तसेच भविष्यातील आयोजनासाठी मार्गदर्शन केले. या MUN चे समन्वयन विद्यार्थी समन्वयक कु. प्रसाद सराटकर आणि कु. अथर्व आदक यांनी केले. या MUN मुळे विद्यार्थ्यांना कूटनीती, नेतृत्व आणि जागतिक प्रश्नांवर चिंतन करण्याचा अमूल्य अनुभव मिळाला.

### ओपाइन ग्रुप सोबत सामंजस्य करार

दि. ७ ऑगस्ट, २०२५ रोजी विभागाने विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक कौशल्यविकासासाठी ओपाइन ग्रुप सोबत एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार स्वाक्षरित केला आहे. या सामंजस्य करारांतर्गत विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिपची संधी, उद्योगतज्ज्ञांचे गेस्ट लेक्चर्स, वर्कशॉप्स व ट्रेनिंग प्रोग्रॅम्स, उद्योगपरिषद, करिअर मार्गदर्शन सत्र इत्यादी उपक्रम राबवले जाणार आहेत. संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, विभागप्रमुख डॉ. प्रसन्न शेटे आणि ओपाइन ग्रुप चे संस्थापक, डॉ. आनंद कोल्हारकर यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. या करारासाठी प्रा. डॉ. माधवी बेलसरे, प्रा. निलेश कुचेकर, आणि प्रा. कोमल वांजरे यांनी संयोजनाची जबाबदारी पार पाडली.

### किम्पॅक्ट स्पर्धेत विद्यार्थ्यांचे यश

विभागाच्या चार संघांनी केपीआयटीने आयोजित केलेल्या किम्पॅक्ट स्पर्धेत नाविन्यपूर्ण प्रकल्प कल्पना प्रदर्शित करण्यासाठी सहभाग घेतला. सानवी सोनवणे, हेमिल शाह, सदस्य यश सोलंकी, श्रावणी ढेंबरे यांनी त्यांची ''लॅपरोस्कोपिक सर्जरी सिम्युलेशन'' कल्पना सादर केली आणि राष्ट्रीय स्तरावरील अंतिम स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली.

निकिता चौधरी यांनी केपीआयटीच्या केपीआयटी नोव्हा उपक्रमांतर्गत ६ महिन्यांचा फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम पूर्ण केला आणि मॉडेल बेसेस डिझाइनसाठी विद्यार्थ्यांचा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला.

## डिजिटल मार्केटिंग या विषयावर सत्राचे आयोजन

सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५ रोजी विभागातर्फे NDLI क्लब अंतर्गत ''डिजिटल मार्केटिंग'' या विषयावर सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्राचा उद्देश विद्यार्थ्यांना डिजिटल मार्केटिंगच्या भविष्यासंदर्भात मौल्यवान माहिती देणे तसेच आजच्या स्पर्धात्मक व्यवसायिक वातावरणातील त्याचे वाढते महत्त्व अधोरेखित करणे हा होता.

## मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग

### सुप्रा रेसर कार डिझाईन व फॅब्रिकेशन टीमला राष्ट्रीय पातळीवर अव्वल क्रमांक

नोएडा (दिल्ली) येथे झालेल्या स्पर्धेत आयआयटी, एनआयटीसह देशातील आघाडीच्या संस्थांचा सहभाग - सन २०२५ मध्ये अभूतपूर्व यश

महाविद्यालयाच्या यांत्रिकी विभागाच्या सुप्रा रेसर कार डिझाईन व फॅब्रिकेशन टीमने ऐतिहासिक कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे. देशातील आयआयटी, एनआयटी तसेच आघाडीच्या तांत्रिक संस्थांचा सहभाग असलेल्या या प्रतिष्ठित स्पर्धेत महाविद्यालयाच्या टीमने सर्वांना मागे टाकत ही उल्लेखनीय कामगिरी केली.

गेल्या काही वर्षांपासून महाविद्यालयाची टीम सातत्याने यशाची पायरी चढत होती. सन २०२२ मध्ये तिसरा क्रमांक, सन २०२३ मध्ये दुसरा क्रमांक, सन २०२४ मध्ये पुन्हा दुसरा क्रमांक आणि अखेर २०२५ मध्ये अखिल भारतीय स्तरावर अव्वल क्रमांक मिळवत टीमने ऐतिहासिक यश संपादन केले.

**प्राप्त पारितोषिके व बक्षिसाची रक्कम पुढील प्रमाणे**

१.अखिल भारतीय प्रथम क्रमांक - रु. २,००,०००/-
२. ॲक्सेलरेशन इव्हेंट विजेता - रु. २५,०००/-
३. स्किडपॅड इव्हेंट विजेता - रु. २५,०००/-
४. एंड्युरन्स इव्हेंटमध्ये प्रथम उपविजेता - रु. २०,०००/-

तसेच टीमचे मार्गदर्शक प्रा. महेश कांबळे यांना त्यांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनाबद्दल प्रतिष्ठेचा 'द्रोणाचार्य पुरस्कार' बहाल करण्यात आला. या अद्वितीय यशाबद्दल टीमचे अभिनंदन करत महाविद्यालयीन अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे पेढा भरवून तसेच गुलाबाचे फूल देऊन कौतुक केले. या उल्लेखनीय यशाबद्दल प्रा. महेश कांबळे यांचे व त्यांच्या टीमचे विभागप्रमुख डॉ. एम. एम. भूमकर तसेच प्र. प्राचार्य डॉ. एम. आर. तारांबळे, संचालक श्री. सुनील रेडेकर आणि संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर यांनी विशेष अभिनंदन केले.

### ३डी प्रिंटिंग एक्सलन्स सेंटरचे मोठे यश - उद्योग क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी

विभागात ३डी प्रिंटिंग एक्सलन्स सेंटरने औद्योगिक क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. साखर कारखान्यासाठी अत्यंत आव्हानात्मक उत्पादनाची यशस्वी रचना, निर्मिती व संयोजन प्रगत ३डी प्रिंटिंग तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करण्यात आली. हे उत्पादन एकाच भागात छापणे शक्य नसल्यामुळे एकूण २८ वेगवेगळे भाग छापून ते अत्यंत कौशल्यपूर्ण पद्धतीने जोडण्यात आले. नेमकेपणा व गुणवत्तेसाठी तब्बल तीन आठवडे कसून मेहनत घेऊन हे कार्य पूर्ण करण्यात आले. दि. १८ जुलै २०२५ रोजी महाविद्यालयाचे संचालक प्रा. आर. जी. कडुसकर यांनी अंतिम उत्पादन अमोल उद्योग, पुणे येथील श्री. साहिल फडणीस यांच्याकडे सुपूर्द केले. या सल्लागार प्रकल्पातून प्रयोगशाळेसाठी रु. ४४,०००/- उत्पन्न मिळाले असून महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेची उद्योग क्षेत्रात वास्तव समस्यांवर उपाय देण्याची क्षमता सिद्ध झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल प्रा. एस. एस. चिक्शे व त्यांच्या टीमचे यांत्रिकी अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. एम. एम. भूमकर तसेच प्र. प्राचार्य डॉ. एम. आर. तारांबळे, संचालक श्री. सुनील रेडेकर आणि संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर यांनी विशेष अभिनंदन केले.

## कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग

### एनबीए ॲक्रिडिटेशन

महाविद्यालयाच्या संगणक अभियांत्रिकी विभागाला राष्ट्रीय मान्यता मंडळाने (NBA) तीन शैक्षणिक वर्षांसाठी २०२५-२६, २०२६-२७ आणि २०२७-२८ मान्यता दिली आहे.

### फास्ट ऑफर इंटरनॅशनल प्रोग्रामसाठी निवड

विभागातील विद्यार्थिनी कु. जागृती पाटील हिची फास्ट ऑफर इंटरनॅशनल प्रोग्राम अंतर्गत (पूर्वी आशिया टू जपान) जून २०२५ मुलाखत फेरीद्वारे टॉपकॉन कॉर्पोरेशन, जपान या कंपनीमध्ये निवड करण्यात आली आहे. सामील होण्याची तारीख : एप्रिल २०२६

### सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षण कार्यशाळेत विद्यार्थ्यांचा सहभाग

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी दि. ८ आणि ९ जुलै २०२५ रोजी संस्थेच्या प्रशिक्षण आणि प्लेसमेंट सेलने आयोजित केलेल्या २ दिवसीय सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षण कार्यशाळेत सहभाग घेतला.

### डिजिटल ॲप्लिकेशन विकसित

विद्यार्थी कु. सार्थक पंचपोर, कु. प्रणव शेरेकर आणि कु. हर्षवर्धन माने - यांनी इस्कॉनच्या भक्तांसाठी मंदिरातील दैनंदिन सेवा उपक्रमांचे व्यवस्थापन करण्यासाठी एक डिजिटल ॲप्लिकेशन यशस्वीरित्या विकसित केले आहे. हा उपक्रम बीआरसीच्या वरिष्ठ मार्गदर्शकांनी, श्री. निखिल दमवाणी प्रभुजी आणि टीमच्या आशीर्वादाने आणि सहकार्याने मार्गदर्शन केला आणि आयकेएसच्या सामंजस्य करारानुसार राबविण्यात आला. या विद्यार्थ्यांना श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या शुभ प्रसंगी, नियमित भगवद्गीता सत्रादरम्यान शेकडो ज्येष्ठ भक्तांच्या उपस्थितीत एच. जी. श्री राधेश्याम प्रभुजी, एम टेक, सुवर्णपदक विजेता आयआयटी मुंबई यांनी सन्मानित केले. ते मंदिराचे अध्यक्ष आणि जागतिक वक्ता देखील आहेत.

## आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड डेटा सायन्स

### सायबर सुरक्षा जनजागृती - Cybersafe

दि. २४ जुलै २०२५ रोजी विभागाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी Cybersafe या शीर्षकाखाली सायबर सुरक्षेवरील एक प्रभावी जनजागृती कार्यक्रम ''डिजिटल जगात एक पाऊल पुढे रहा - स्मार्ट, सुरक्षित आणि सायबर जागरूक व्हा!'' या विचारधारेवर आधारित कार्यक्रम आयोजित केला होता. विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि त्यांना डिजिटल सुरक्षिततेबाबत सजग करणे यासाठी हा कार्यक्रम विशेषतः मुक्तांगण इंग्लिश स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९ येथील इ. ९वी व १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला होता. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेच्या मूलभूत संकल्पना आणि सुरक्षित ऑनलाईन वागणुकीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे, विभाग प्रमुख डॉ. एम. पी. अत्रे, डॉ. पायल तायडे ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी आणि सहाय्यक प्राध्यापक यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

### अध्यापक अभिमुखता कार्यक्रम - आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावर फॅकल्टी ओरिएंटेशन प्रोग्रॅम

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संगणक अभियांत्रिकी अभ्यास मंडळाच्या मार्गदर्शनाखाली दुसऱ्या वर्षासाठी NEP अभ्यासक्रम सुधारणा (२०२४ नमुना) अंतर्गत आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावर अध्यापक अभिमुखता कार्यक्रम दि. १४ जुलै २०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ५.००, महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. अत्रे यांनी रिसोर्स पर्सन म्हणून सहभाग घेतला. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. विजयालक्ष्मी कानडे आणि प्रा. स्वप्ना शिंगडे होते. या कार्यक्रमात ७१ प्राध्यापक सहभागी झाले होते. सर्व सहभागी सदस्यांनी विषयाच्या नव्या अभ्यासक्रमावरील महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा केली.

**डॉ. मीनाक्षी पी. अत्रे यांचे उल्लेखनीय योगदान**

**आंतरराष्ट्रीय परिषद - ICBTCardiff२०२५ (UK) परिषदेमध्ये अधिवेशन अध्यक्षा म्हणून कार्य**

डॉ. मीनाक्षी पी. अत्रे यांनी दि. २३ व २४ जुलै २०२५ रोजी युकेमध्ये आयोजित ICBTCardiff २०२५ आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सेशन चेअर (अधिवेशन अध्यक्षा) म्हणून कार्य केले. त्यांनी परिषदेमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले.

**शोधनिबंध सादरीकरण - 'SLoRA'**

या परिषदेत 'SLoRA' या विषयावर शोधनिबंध सादर करण्यात आला. सदर शोधनिबंध डॉ. मीनाक्षी पी. अत्रे यांनी कु. हेरंब पाटील (इ ॲण्ड टि सी विभाग) आणि कु. वैष्णवी सनम (आर्टिफिशियल इंटेलिजेन्स ॲण्ड डेटा सायन्स विभाग) या दोन विद्यार्थ्यांसह सादर केला. हे सादरीकरण संस्थेच्या संशोधन परंपरेचा गौरवशाली भाग ठरले.

**BoS सदस्य म्हणून नियुक्ती व स्वायत्तता बैठकीतील सहभाग**

डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, तळेगाव, पुणे यांनी डॉ. मीनाक्षी पी. अत्रे यांची अभ्यास मंडळ (BoS) सदस्य म्हणून नियुक्ती केली. त्यांनी दि. १२ जुलै २०२५ रोजी संस्थेच्या प्रथम स्वायत्तता बैठकीत सक्रिय सहभाग नोंदवला व शैक्षणिक धोरणांबाबत अमूल्य मार्गदर्शन केले.

**NDLI सत्र डीप लर्निंग विषयावर विशेष मार्गदर्शन**

दि. २६ जुलै २०२५ रोजी विभागात NDLI अंतर्गत एक विशेष सत्र आयोजित करण्यात आले. या सत्रात डॉ. मिनाक्षी पी. अत्रे यांनी ''Deep Learning'' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. सदर सत्रात एकूण ७० विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विषयावरील संकल्पना, ॲप्लिकेशन आणि भविष्यकालीन शक्यता यांवर आधारित माहितीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या सत्राचे समन्वयक म्हणून डॉ. रवींद्र एस. आपरे यांनी काम पाहिले.

❊ डॉ. रवींद्र एस. आपरे यांनी दि. १७ ते १९ जुलै २०२५ दरम्यान पणजी, गोवा, भारत येथे आयोजित १० व्या आंतरराष्ट्रीय परिषदेवर (ICT for Sustainable Development, Springer Nature) संशोधन पेपर सादर केला. पेपरचे शीर्षक होते ''A Systematic Review of Denial of Service Attack Resilience in IEEE 802.11 Networks''. या सादरीकरणाला जागतिक पातळीवरील संशोधक व तज्ज्ञांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

❊ डॉ. रवींद्र एस. आपरे यांनी दि. १७ ते १९ जुलै २०२५ दरम्यान, पणजी, गोवा (भारत) येथे झालेल्या 10th International Conference on ICT for Sustainable Development, Springer Nature या आंतरराष्ट्रीय परिषदेत आपले संशोधन सादर केले. त्यांनी ''Pragmatic Augmentation in Aqua Status Prediction using Hybrid Learning Techniques and Optimization'' या विषयावर आपले संशोधन पत्र सादर केले. या परिषदेत देश-विदेशातील संशोधकांनी शाश्वत विकासासाठी आयसीटी तंत्रज्ञानाच्या विविध पैलूंवर विचारमंथन केले.

❊ दि. २ ऑगस्ट २०२५ रोजी समाज प्रबोधनासाठी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी महिला सशक्तीकरण या विषयावर नाटक सादर केले. हा उपक्रम कम्युनिटी एंगेजमेंट प्रोजेक्ट अंतर्गत मार्गदर्शक प्रा. रवींद्र मुळे व प्रा. पल्लवी बंगाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या कार्यक्रमास प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे, विभाग प्रमुख डॉ. मीनाक्षी अत्रे व विभागातील सर्व शिक्षकवृंद यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांनी प्रभावी संवाद व अभिनयातून महिला सशक्तीकरणाचा संदेश समाजापर्यंत पोहचवला.

❊ Tech Master India आयोजित Code for Bharat 2.0 Hackathon मध्ये विभागातील कु. दिवेश अडिवरेकर (तृतीय वर्ष), कु. अथर्व करंजवणे (तृतीय वर्ष) आणि कु. वेदांत चरेगावंकर (तृतीय वर्ष

इलेक्ट्रिकल) या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. ही स्पर्धा Microsoft Office, Sovereign Capital, Noida (Delhi NCR) येथे पार पडली. या यशामध्ये विभागप्रमुख व सर्व मार्गदर्शकांचे मोलाचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

❋ राष्ट्रीय डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया (NDLI) च्या सहकार्याने Survey Paper Writing या विषयावर NDLI क्लब सत्राचे आयोजन दि. ४ ऑगस्ट २०२५ रोजी करण्यात आले. या सत्रात डॉ. सचिन सुर्यवंशी व डॉ. पायल तायडे यांनी मार्गदर्शन केले. एकूण ९७ सहभागी या सत्रात सहभागी झाले आणि संशोधन पेपर लेखनाविषयी महत्त्वपूर्ण माहिती मिळवली. डॉ. रवींद्र एस. आपरे यांनी कार्यक्रमाची आयोजन व्यवस्था पाहिली.

❋ विभाग प्रमुख डॉ. मीनाक्षी अत्रे यांनी विद्यार्थिनी कु. वैष्णवी सनम व विद्यार्थी कु. हेरंब पाटील यांच्यासह दि. ११ ते १३ ऑगस्ट २०२५ रोजी लंडन, यूके येथे झालेल्या International Conference COMCONF मध्ये सहभाग घेतला. त्यांनी ''Unlearning of LLMs'' या विषयावर संशोधन पेपर सादर केला. ही सादरीकरणे Mathematical Society of London च्या वतीने आयोजित परिषदेत झाली.

❋ नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकल टिचर्स ट्रेनिंग अँड रिसर्च, भोपाळ यांच्या वतीने पुणे येथे पाच दिवसीय STTP आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात प्रा. रवींद्र मुळे यांनी सक्रिय सहभाग नोंदवल्यामुळे त्यांना अध्यापनात नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळाली.

## इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग

### अभिनंदनीय

दि. २ ते ५ ऑगस्ट २०२५ या कालावधीमध्ये नोएडा येथे आयोजित नॅशनल लेव्हल हॅकॅथॉन स्पर्धा मायक्रोसॉफ्ट ऑफिस मध्ये तृतीय वर्षाचा विद्यार्थी कु. वेदांत चरेगावकर आणि एआयडिस शाखेतील दोन विद्यार्थी यांच्या संघाने ''कोड फॉर भारत सिझन २'' या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. एकूण १०४८३ रेजिस्ट्रेशन्स आणि २५०० पेक्षा अधिक संघांमधून त्यांनी हे यश मिळवले.

### एक्स्पर्ट सेशनचे आयोजन

प्रा. डॉ. मंगेश ठाकरे यांनी दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी ''रिन्यूएबल सोलर पॉवर्ड EV चार्जिंग स्टेशन : डिझाईन, टेक्नॉलॉजी, चॅलेंजेस अँड अपॉर्च्युनिटी'' या विषयावर एक्स्पर्ट सेशन घेतले. हे सेशन, के. के. वाघ पॉलिटेक्निक, नाशिक यांनी एआयसीटीई अटल फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम तर्फे आयोजित केले होते .

### स्टुडंट्स असोसिएशन तर्फे विविध उपक्रमांचे आयोजन

मंगळवार दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशनतर्फे वर्ष २०२५-२६ साठीच्या उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाकरीता आदरणीय ले. कर्नल (रिटायर्ड) सुरेश पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी धरणांमधील गाळ स्वच्छतेच्या उपक्रमांविषयी माहिती देऊन जलसाठा वाढविण्याकरीता प्रबोधन केले. तसेच विद्युत विभागातील २००३ सालातील माजी विद्यार्थी ले. कर्नल (रिटायर्ड) श्री. विवेक नेने हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. दोन्ही सन्माननीय पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना आर्म्ड फोर्सेस मधील अनुभव सांगून मार्गदर्शन केले. कार्यक्रमात स्टुडंट्स असोसिएशन तर्फे वर्षभरात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. महाविद्यालयाचे संचालक श्री. सुनील रेडेकर व प्रा. राजेंद्र कडुसकर तसेच प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे यांनाही या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सांस्कृतिक सादरीकरणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## प्रिंटिंग इंजिनिअरिंग विभाग

### डिजिटल प्रिंट एशिया समिट २०२४

दि. २१ ते २३ ऑगस्ट २०२५ रोजी जयपुर येथे आयोजित डिजिटल प्रिंट एशिया समिट २०२५, या कॉन्फरन्स साठी संचालक श्री. सुनील रेडेकर आणि विभाग प्रमुख प्रो. मधुरा महाजन यांना आमंत्रित केले होते. या समिट दरम्यान डिजिटल प्रिंटिंग या विषयावर सखोल चर्चा झाली. तसेच प्रिंटिंग आणि पॅकेजिंग विभागासाठी विविध इंडस्ट्रीज बरोबर काम करण्याचे प्रयोजन रूपरेषा आखण्यात आली. या कॉन्फरन्स दरम्यान संचालक श्री. सुनील रेडकर आणि श्रीलंका प्रेस ओनर्स असोसिएशनचे (SLAP) प्रमुख श्री. जनका रत्नकुमारा यांची इंटरनॅशनल इंटर्नशिप, सर्टिफिकेट कोर्सेस, एम. टेक. कोर्सेस या संबंधी चर्चा झाली. तसेच पुणे विद्यार्थी गृह आणि (SLAP) या दोन्ही संस्थांच्या सहभागाने शिक्षण आणि तंत्रज्ञान यांच्या वृद्धीसाठी संयुक्तपणे काम करणेबाबत चर्चा झाली.

हैदराबाद येथे आयोजित केलेल्या बोर्ड ऑफ स्टडीज मिटिंगसाठी विभाग प्रमुख प्रा. मधुरा महाजन यांना आमंत्रित करण्यात आले होते.

### कोरल ड्रॉ या विषयावर मार्गदर्शन

NEP २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांना 'कोरल ड्रॉ' शिकवण्यासाठी कोरल मास्टर श्री. आनंद दीक्षित यांना बोलावण्यात आले आहे. 'कोरल ड्रॉ' संबंधित सर्व विषयांचे प्रात्यक्षिक श्री. आनंद दीक्षित घेणार आहेत. श्री. आनंद दीक्षित यांच्या अनुभवाचा फायदा सेकंड इयर, थर्ड इयर आणि फायनल इयर च्या विद्यार्थ्यांना संपूर्ण सत्र भर मिळणार आहे.

### पॅकेज डिझाईन सेशनचे आयोजन

ऑनर्स कोर्स साठी डसॉल्ट सिस्टीम यांचे सॉलिड वर्क्स हे सॉफ्टवेअर वापरून पॅकेज डिझाईनिंग करण्याचे सेशन्स ठेवण्यात आली. ही सेशन्स संपूर्ण सत्रभर चालणार आहेत.

### एक्सपर्ट लेक्चरचे आयोजन

द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी कम्युनिटी एंगेजमेंट या विषया अंतर्गत Fundamentals of 5S and its implementation in Printing Industry या विषयावर श्री. रमेश खिस्ते (ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट ऑफिसर) यांचे लेक्चर ठेवण्यात आले होते.

## प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभाग

दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी, संशोधन समन्वयक डॉ. एस. आर. सूर्यवंशी यांनी प्राध्यापकांनी हाती घ्यायच्या संशोधन कार्यासाठी आवश्यक असलेल्या प्रॉब्लेम स्टेटमेंट्सच्या अद्ययावत माहितीवर चर्चा करण्यासाठी एक बैठक आयोजित केली होती.

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेत सर्व प्रथम वर्ष बी.टेक. विभागातील कर्मचारी सहभागी आहेत. तसेच ऑटोनॉमीच्या कामाची तयारी सुरू आहे.

यूएचव्ही सेल समन्वयक, डॉ. श्रीलेखा घट्टे यांनी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आणि यूएचव्ही कोर्स शिकवणाऱ्या शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी बैठकीमध्ये यूएचव्हीच्या विषयी माहिती दिली.

## ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभाग

* विभागामार्फत विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट इंडस्ट्रीसाठी सज्ज करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. मागील महिन्यात इंटरव्ह्यू रेडिनेस ड्राइव्हच्या माध्यमातून १२० अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी मॉक इंटरव्ह्यू व ग्रुप डिस्कशनमध्ये सक्रिय सहभाग घेतला आणि त्याचा लाभ मिळवला .

* ५ महिन्यांत ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभागाने ३६ उद्योग भेटी घेतल्या, ज्यामागचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांसाठी उद्योगभेटी आयोजित करणे, इंटर्नशिप संधी उपलब्ध करून देणे व प्लेसमेंटच्या संधी निर्माण करणे हे होते. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आज अखेर पर्यंत एकूण ३७७ विद्यार्थ्यांची निवड झाली असून ४० विद्यार्थ्यांचे निकाल प्रतीक्षेत आहेत. इंडस्ट्रियल ओरिएंटेशनचे सत्र आयोजित करण्यात आले व या

सत्रातून विद्यार्थ्यांना उद्योगविषयक मूलभूत माहिती देण्यात आली. एमबीएच्या विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास व तयारीसाठी मॉक इंटरव्ह्यू घेण्यात आले. या सर्व कार्यक्रमांचे आयोजन श्री. अविनाश पोरे, प्रा. डॉ. पायल तायडे व प्रा. डॉ. एन. जी. जयस्वाल, प्रा. रमेश खिस्ते यांनी केले. प्रा. निखिल लिमये, प्रा. दिप्ती पुजारी, प्रा. पी. फर्नांडिस यांनी सराव सत्रे घेऊन मुलांचा आत्मविश्वास वाढवला.

**एमबीए विभाग**

विभागामार्फत दि. २८ जुलै ते १ ऑगस्ट २०२५ या कालावधीत 'फॉस्टरिंग इनोव्हेशन ॲण्ड स्टार्टअप कल्चर इन अकॅडमिक इन्स्टिट्यूशन्स' या विषयावर पाच दिवसांचा फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाद्वारे शैक्षणिक संस्थांमध्ये नवे उपक्रम व स्टार्टअप संस्कृती वाढविण्यासाठी आवश्यक कौशल्ये, ज्ञान व दृष्टीकोन विकसित करण्यावर भर दिला गेला. कार्यक्रमात विविध नामवंत वक्ते, उद्योजक व तज्ज्ञ मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले, सहभागी शिक्षकांना नवकल्पना व उद्योजकता संस्कृतीची शैक्षणिक संस्थांमध्ये अंमलबजावणी कशी करता येईल याविषयी सखोल माहिती मिळाली. ***

**※ संस्थेचे ज्येष्ठ माजी विद्यार्थी श्री. अशोक धर्माधिकारी आणि त्यांचे सहकारी यांच्या तर्फे त्र्यंबकेश्वर येथील हिवाळीगावातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप ※**



संस्थेचे देणगीदार व ज्येष्ठ माजी विद्यार्थी श्री. अशोक धर्माधिकारी आणि त्यांच्या पत्नी सौ. कुमुद अशोक धर्माधिकारी, नाशिक हे अनेक वर्षांपासून वेगवेगळ्या प्रकारे सामाजिक कार्य करीत आहेत. श्री. अशोक धर्माधिकारी, सौ. कुमुद अशोक धर्माधिकारी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दि. १६ ऑगस्ट २०२५ रोजी त्र्यंबकेश्वर येथील आदिवासी भागातील हिवाळी गाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेमधील विद्यार्थ्यांना वह्या व शालेय वस्तूंचे आणि रामदास स्वामी लिखित 'मनाचे श्लोक' या पुस्तकाचे वाटप केले. या उपक्रमासाठी त्यांनी श्री. रविंद्र कुलकर्णी, कुंदा कुलकर्णी, विभा कुलकर्णी, विनय सातपूरकर, हरीश राधे, राजीव वाघमारे यांचे सहकार्य मिळाले. ***

## विद्याभवन–घाटकोपर, मुंबई शाखा
**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी व इंग्रजी माध्यम
**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**समन्वयिका : श्रीमती शुभांगी मच्छिंद्र जाधव**
**पर्यवेक्षिका : सौ. पूजा फरिया (इंग्रजी माध्यम)**

### दीप अमावस्या
चंद्र-सूर्याच्या तेजस्वी प्रकाशने उजळतील सर्व दिशा, सुखाची नवी उमेद जागवेल दर्शदीप अमावस्या.....

दि. २४ जुलै २०२५ वार गुरुवार रोजी शाळेच्या अप्पासाहेब गरगटे सभागृहात दीप पूजेचे आयोजन केले गेले. दोन्ही माध्यमाच्या सर्व शिक्षकांनी मिळून सभागृहात विविध फुलांच्या व पानांच्या छान रांगोळ्या काढून त्यावर दिव्यांची आरास केली. कार्यक्रमाची सुरूवात समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव, समन्वयिका श्रीमती लक्ष्मी गोपालकृष्णन, पर्यवेक्षिका श्रीमती पूजा फरिया यांच्या हस्ते दिवे प्रज्वलित करून करण्यात आली, तसेच त्यांनी मुलांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण केले व मुलांना चांगल्या आरोग्यासाठी आणि दीर्घायुष्यासाठी आशीर्वाद दिला. श्रीमती सारिका यांनी सर्व मुलांना दीप अमावस्येची माहिती सांगितली. तसेच श्रीमती नेहा यांनी दीप अमावस्येची गोष्ट सांगून अमावस्येचे महत्त्व विषद केले. विद्यार्थ्यांकडून ।। शुभं करोति कल्याणम् ।। ही प्रार्थना म्हणून घेतली. सर्व शिक्षकांनी आपापल्या वर्गामध्ये मुलांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण केले. सभागृहात दिव्यांचा झगमगाट अगदी प्रफुल्लित करत होता. शेवटी विद्यार्थ्यांना शेवबुंदीचा प्रसाद देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी
**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**समन्वयिका : श्रीमती शुभांगी मच्छिंद्र जाधव**

### नागपंचमी
नागपंचमीचा सण आला, भक्तिभाव मनी दाटला, दूध, लाह्या वाहू नागाला, प्रेमाने वंदन करू त्याला.....

दि. २९ जुलै २०२५ रोजी शाळेच्या अप्पासाहेब गरगटे सभागृहात नागपंचमी सणाचे औचित्य साधून बाल सभा आयोजित करण्यात आली. सर्व शिक्षकांनी झाडांच्या विविध पानांनी वारूळ तयार केले व मातीचे नाग रंगवून, सजवून त्यांची प्रतिष्ठापना केली. समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव यांनी सर्व शिक्षकांसमवेत नाग देवतांचे पूजन केले. श्रीमती नेहा यांनी विद्यार्थ्यांना नागपंचमी संदर्भातील माहिती सांगितली. नंतर शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी झिम्मा व फुगड्यांचा मनमुराद आनंद लुटला. काही शिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबत सणाला अनुसरून गाणी म्हटली. सर्व विद्यार्थ्यांनी नाग देवतांना वंदन केले आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी
**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**पर्यवेक्षिका : सौ. पूजा फरिया (इंग्रजी माध्यम)**

### पपेट शो सादरीकरण
दि. २५ जुलै २०२५ रोजी मूल्य शिक्षण उपक्रमांतर्गत मोठ्या शिशूच्या शिक्षकांनी 'एकते मध्येच शक्ती आहे' या विषयावर आधारित पपेट शो सादर केला. रंगीत बाहुल्यांच्या माध्यमातून आणि मनमोहक कथाकथनाद्वारे, मुलांनी एकत्र राहण्याचे आणि एकमेकांना मदत करण्याचे महत्त्व विषद केले. या गोष्टीतून मुलांना एकोप्याचे आणि सहकार्याचे महत्त्व पटले. हे सादरीकरण फक्त मनोरंजनात्मक नव्हते, तर त्यातून जीवनातील एक सुंदर धडा देखील मिळाला.

**मोबाईल जनजागृती नाटिका**

दि. १ ऑगस्ट २०२५ रोजी छोट्या विद्यार्थ्यांमध्ये जागृती करण्यासाठी छोट्या शिशूच्या शिक्षकांनी मोबाईल जनजागृती या विषयावर एक माहितीपूर्ण आणि विचारप्रवर्तक नाटिका सादर केली. या नाटिकेत मोबाईलचा जास्त वापर केल्यास होणारे दुष्परिणाम जसे डोळ्यांवर ताण, मैदानी खेळांची कमतरता आणि एकाग्रतेचा आभाव यावर प्रकाश टाकण्यात आला. मजेशीर संवाद आणि सोप्या कृतींद्वारे मुलांना मोबाईल मर्यादित वापरण्याचे महत्त्व समजले.

**स्वातंत्र्यदिन सोहळा**

दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. छोट्या विद्यार्थ्यांनी रंगतदार सादरीकरण करताना खऱ्या आयुष्यातील नायकांची भूमिका साकारली, आपले आरोग्य जपणारा डॉक्टर, अन्नधान्य देणारा शेतकरी, संशोधन करणारा वैज्ञानिक, आकाशमार्गे देशाचे रक्षण करणारा हवाई दलाचा जवान, उद्याचा भारत घडवणारा तंत्रज्ञान तज्ज्ञ, तसेच क्रिकेट व बॅडमिंटन व इतर खेळांद्वारे देशाचा गौरव वाढवणारे खेळाडू. विद्यार्थ्यांच्या रंगतदार नृत्य व सादरीकरणातून असा संदेश दिला गेला की प्रत्येक व्यवसाय, प्रत्येक स्वप्न व प्रत्येक कौशल्य भारताला अधिक उज्ज्वल बनवते. या कार्यक्रमाला पालक व शिक्षकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## विद्याभवन प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. गणेश सुदाम कणसे**

**पालक प्रतिनिधी मिटिंग**

शनिवार दि. १९.०७.२०२५ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी विभागातील पालक शिक्षक संघ, शाळा व्यवस्थापन समिती, बाल शिक्षण हक्क, पोक्सो समिती, बाल सखी सावित्री समिती यांची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील पहिली संयुक्त सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती. सभेत विविध समित्यांच्या उपाध्यक्ष, उपसचिव पदाच्या नियुक्त्या करण्यात आल्या. शालेय कामकाज, विद्यार्थ्यांची प्रगती, शालेय शिस्त, नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या Spoken English क्लास या व इतर अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी सर्व समित्यांच्या पालकांना मार्गदर्शन केले व नवनियुक्त पालकांचे अभिनंदन केले. उपस्थित सर्व पालक प्रतिनिधींचे आभार मानले.

**टिळक पुण्यतिथी**

दि. १ ऑगस्ट २०२५ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी विभागात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त बाल सभेचे आयोजन करण्यात आले होते. इ. १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांनी बाल सभेत लोकमान्य टिळकांबद्दल गोष्टी, गाणी, पोवाडा, घोषणा या माध्यमातून, टिळकांबद्दलच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. श्रीमती शीतल प्रभू यांनी लोकमान्य टिळकांची माहिती दिली. मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापिका : श्रीमती अनघा संतोष सावंत**

**हस्ताक्षर स्पर्धा**

सुसंस्कृत विचार सुंदर शब्दांत उमटतात आणि सुंदर हस्ताक्षरातून फुलतात. दि. १७ जुलै २०२५ रोजी विभागामध्ये जल हाऊस तर्फे इ. १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांकरिता हस्ताक्षर स्पर्धा उत्साहात पार पडली. हस्ताक्षर म्हणजे फक्त अक्षरे नाहीत, ती व्यक्तिमत्त्वाचा आरसा आहे. सर्व विद्यार्थ्यांनी दाखवलेला उत्साह व सहभाग पाहता ही स्पर्धा अत्यंत यशस्वी ठरली.

**चित्रकला स्पर्धा**

दि. २५ जुलै २०२५ रोजी वायू हाऊस तर्फे इ. १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी आंतरवर्गीय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेचे आयोजन जल हाऊसचे इनचार्ज शिक्षक श्रीमती कविता पुजारी, श्रीमती ज्योती आणि श्री. समीर शिरकांडे यांनी मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयांवर सर्जनशीलता आणि कल्पकता दाखवत मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. स्पर्धेचे विषय अनुक्रमे इ. १ली - कॅटरपिलर, इ. २री - निसर्गचित्र, इ. ३री- पावसाळी दिवस, इ. ४थी - प्राणीसंग्रहालय.

**इंग्रजी भाषेच्या प्रशिक्षण कार्यशाळेचा अहवाल**

दि. २५ जुलै २०२५ रोजी IRA by Orchids, अंधेरी (पूर्व), मुंबई येथे भारती भवन पब्लिशर्स यांच्या वतीने ''Essentials of 21st Century English Language Teaching'' या विषयावर एक भव्य इंग्रजी भाषा प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेत शिक्षिका श्रीमती रेश्मा पैलकर यांनी सहभाग नोंदविला. या कार्यशाळेचे प्रमुख वक्ते कर्नाटक येथील श्री. चंद्रशेखर एच. बी. होते. इंग्रजी भाषेच्या अध्यापनातील ३६ वर्षांचा अनुभव असलेले हे प्रख्यात व्यक्तिमत्त्व. त्यांच्या स्पष्ट व प्रभावी सादरीकरणामुळे सर्व सहभागींसाठी ही कार्यशाळा प्रेरणादायी ठरले.

कार्यशाळेदरम्यान शब्दसंग्रह, वाचन समज आणि व्याकरण शिकवण्यासाठी उपयुक्त अशा प्रात्यक्षिक उपयोगी रणनीती सादर करण्यात आल्या. श्री. चंद्रशेखर सरांनी दाखवून दिलेल्या Interactive पद्धती वर्गात सहजपणे अवलंबता येण्यासारख्या आहेत. या कार्यशाळेमुळे शिक्षकांना नव्या अध्यापन पद्धती आत्मसात करण्याची उत्तम संधी मिळाली.

**शाळा मंत्रिमंडळ शपथविधी**

दि. २९ जुलै २०२५ रोजी विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि प्रेरणादायी असा शाळा मंत्रिमंडळ शपथविधी सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यापूर्वी शाळेत हेड गर्ल आणि हेड बॉय पदांसाठी निवडणूक घेण्यात आली होती. या निवडणुकीत विद्यार्थ्यांनी प्रातिनिधिक लोकशाहीचा उत्तम अनुभव घेत आपापल्या पसंतीच्या उमेदवारांना मतदान केले. निवडणुकीनंतर नवनिर्वाचित हेड गर्ल, हेड बॉय तसेच सांस्कृतिक मंत्री, क्रीडा मंत्री, शैक्षणिक मंत्री आणि शिस्त मंत्री या पदांसाठी निवड झालेल्या सर्व मॉनिटर्सचा शपथविधी सोहळा पार पडला.

कार्यक्रमाची सुरूवात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीच्या हाऊस उद्घाटन सोहळ्याने झाली. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या हाऊससाठी घोषवाक्ये दिली व शिस्तबद्ध रीतीने उभे राहून आपली उपस्थिती नोंदवली. या भव्य कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत, पूर्व प्राथमिक विभागाचे समन्वयक तसेच माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक आणि समन्वयक उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते नवनिर्वाचित सर्व मॉनिटर्सना बॅचेस प्रदान करून त्यांच्या पदाचा मान आणि जबाबदारी सोपविण्यात आली. श्रीमती अनघा सावंत यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या कर्तव्यांची जाणीव करून देत नेतृत्वगुण, शिस्त आणि प्रामाणिकपणा जपण्याचे मार्गदर्शन केले. यानंतर शैक्षणिक वर्ष २०२५-२६ हाऊस समन्वयक श्रीमती सुजाता दिवेकर यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले.

शपथविधी सोहळ्यात सर्व मॉनिटर्सनी एकमुखाने शपथ घेतली ''मी माझ्या शाळेचा गौरव वाढवण्यासाठी प्रामाणिकपणे आणि निष्ठेने माझी जबाबदारी पार पाडेन.'' कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. दीपक निचित यांनी केले.

**बेस्ट आऊट ऑफ वेस्ट स्पर्धा**

दि. ३१ जुलै २०२५ रोजी अग्नी हाऊस तर्फे इ. १ली ते ४थी या विद्यार्थ्यांसाठी 'बेस्ट आऊट ऑफ वेस्ट' ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या टाकाऊ वस्तूंचा उपयोग करून उपयुक्त व आकर्षक वस्तू तयार केल्या.

# विद्याभवन माध्यमिक मराठी व कनिष्ठ महाविद्यालय

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**प्राचार्य : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

**सलाम बॉम्बे फाऊंडेशन**

शनिवार दि. १९ जुलै २०२५ रोजी सलाम बॉम्बे फाऊंडेशन व विद्याभवन हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आप्पासाहेब गरगटे सभागृहात इ. ८वी व ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'संतुलित आहार' या विषयावर चित्रफित व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

हे व्याख्यान श्रीमती मुक्ता पेडणेकर यांनी घेतले. व्याख्यानामध्ये आपल्या शरीरासाठी Vitamins ची आवश्यकता किती आहे. कोणत्या पदार्थामधून कोणते व्हिटॅमीन मिळतात. प्रोटीन युक्त आहार व कर्बोदकेयुक्त आहार कोणता व आपल्या शरीरासाठी त्यांची किती गरज असते याचे चित्रफितीद्वारे उत्तम मार्गदर्शन केले.

तंबाखू सेवनाने होणारे तोटे, त्यासाठी विद्यार्थ्यांनी कसे जागरूक रहावे याचे मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन श्री. अर्जुन मस्के यांनी केले.

**मनःशक्ती केंद्र, लोणावळा, व्याख्यान**

शनिवार दि. १९ जुलै २०२५ रोजी मनःशक्ती केंद्र, लोणावळा, तर्फे इ. ९वी च्या अस्थिर व चंचल विद्यार्थ्यांसाठी प्रशालेच्या आप्पासाहेब गरगटे सभागृहात व्याख्यान आयोजित केले होते. सकाळी ठीक ९.०० वा. व्याख्यानाची सुरूवात प्रार्थना व ओमकार उच्चारणे झाली. व्याख्यानामध्ये विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा. तणावमुक्त अभ्यास कसा करावा, शिष्टाचार, संस्कार, व्यायाम याचे महत्त्व सांगण्यात आले.

व्याख्यानासाठी सेमी इंग्रजी माध्यमाचे इ. ९वी चे ४५ विद्यार्थी तर इंग्रजी माध्यमाचे इ. ९वी चे ५० विद्यार्थी सहभागी होते.

प्रशालेच्या प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार यांच्या मार्गदर्शनाने व मनःशक्ती केंद्र लोणावळा यांच्या संयुक्त विद्यमानाने प्रशालेमध्ये प्रत्येक महिन्यातून एक असे व्याख्यान आयोजित करण्यात येणार असून विद्यार्थ्यांना त्यांचा नक्कीच फायदा होणार आहे.

**समुपदेशन व्याख्यान इ. १०वी**

शनिवार दि. १९ जुलै २०२५ रोजी 'श्रीमद राजचंद्र मिशन धर्मापूर' या संस्थेने इ. १०वी अ, ब, क मधील विद्यार्थ्यांसाठी समुपदेशनपर व्याख्यान आयोजित केले होते. प्रशालेच्या उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई यांनी संस्थेच्या टीमचे स्वागत केले.

व्याख्यानाची सुरूवात 'इतनी शक्ती हमे देना दाता' या स्फूर्तीगीताने करण्यात आली. व्याख्यानामध्ये Steve & Jons. Stanford यांच्या विषयी व्हिडिओ दाखवण्यात आला. अभ्यास करताना काय करावे याचे मार्गदर्शन संस्थेच्या सदस्या अनिला गाडा यांनी उत्तम प्रकारे विद्यार्थ्यांना केले.

शनिवार दि. २६ जुलै २०२५ रोजी इ. १०वी च्या विद्यार्थ्यांसाठीच समुपदेशन व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानामध्ये स्वतःबद्दल प्रेम वाटणे, नेल्सन मंडेला जीवनपट दाखविला, कठोर परिश्रम केल्याने यश प्राप्त होते, याविषयी श्री. अनिला गाडा यांनी मार्गदर्शन केले.

अशा प्रकारे एकूण १० व्याख्यानांचे आयोजन इ. १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी दर शनिवार एक याप्रमाणे सुरू राहणार असून यातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे समुपदेशन व्हावे असा उद्देश आहे.

**विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा इ. ९वी/ १०वी**

बुधवार दि. ३० जुलै २०२५ रोजी प्रशालेच्या आप्पासाहेब गरगटे सभागृहात इ. ९वी आणि १०वी गटासाठी विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार आणि उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. या स्पर्धेत प्रत्येक हाऊस चे तीन याप्रमाणे एकूण १२ विद्यार्थी सहभागी झाले होते. या सर्व विद्यार्थ्यांची निवड प्रश्नमंजुषेच्या

पहिल्या लेखी फेरीतून करण्यात आली होती. या लेखी फेरीमध्ये एकूण ३२ गटांनी भाग घेतला होता.

ही स्पर्धा श्रीमती मानसी विचारे व श्रीमती सुनिता वायकर यांनी आयोजित केली होती. या स्पर्धेतील विजेते विद्यार्थी गट पुढील प्रमाणे आहेत.

**प्रथम क्रमांक- पृथ्वी हाऊस**

| **विद्यार्थ्याचे नाव** | **इ / तु** |
|---|---|
| १. कु. अथर्व दीपक नारायणकर | १०वी/ब |
| २. कु. सार्थक प्रमोद कदम | १०वी/अ |
| ३. कु. पार्थ अशोक मेणे | १०वी/क |

**द्वितीय क्रमांक- जल हाऊस**

| | |
|---|---|
| १. कु. नयन प्रकाश लोलगे | १०वी/क |
| २. कु. वीर प्रकाश मगदूम | १०वी/ब |
| ३. कु. तन्मय अमित पळसकर | १०वी/अ |

५ फेऱ्यामध्ये झालेल्या या स्पर्धेत विजेते झालेल्या या दोन हाऊस मधील विद्यार्थ्यांचे प्रशालेच्या प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार यांनी हार्दिक अभिनंदन केले. श्रीमती सुनिता वायकर यांनी उपस्थितांचे आभार मानून स्पर्धेची सांगता केली.

## विद्याभवन नं. २ माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. सुनील भालचंद्र पाटील**

### आषाढी एकादशी उत्सव

दि. ५ जुलै २०२५ रोजी विद्याभवन हायस्कूल नं. २ येथील निसर्ग मंडळातर्फे आषाढी एकादशीचा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये इ. ५वी व ६वी तील विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषेत भक्तिभावाने सहभाग घेतला.

कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते श्री. विठ्ठल-रखुमाईची आरती आली. त्यांच्यासोबत विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, विद्याभवन हायस्कूल क्र. २ चे मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर, उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई, पर्यवेक्षक श्री. प्रकाश पवार आणि समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी मिळून फुलांनी पालखी सजविली आणि त्या प्रसंगी त्यांनी भक्तिभावाने अभंग व भजन सादर केले. यानंतर वृक्ष दिंडी आणि पारंपरिक दिंडीने वातावरण भक्तिमय झाले.

### जागतिक अमली पदार्थ विरोध दिन

दि. २६ जून २०२५ रोजी विद्याभवन हायस्कूल नं. २ मध्ये जागतिक अमली पदार्थ विरोध दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना या बाबत माहिती देण्यात आली. तसेच या संदर्भात जनजागृती करण्यासाठी चित्रकला व पोस्टर तयार करणे अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. श्री. संदीप तावडे आणि श्री. सुहास गरदडे तसेच श्रीमती कोकिळा थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली इ. ५वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांनी जागृती, जाणीव आणि जनसंदेश या विषयावर विविध कलाकृती रेखाटल्या आणि आपले विचार व्यक्त केले.

### जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धा

विद्याभवन हायस्कूल नं. २ चा विद्यार्थी कु. आरुष ओजस घाडी, इ. ५वी याने जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धेमध्ये (२०२५) तिसरा क्रमांक पटकाविला आहे. सदर स्पर्धा दि. २४ जून ते २८ जून दरम्यान प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल, विले पार्ले-पूर्व येथे सबर्बन टेबल टेनिस असोसिएशन (TSTTA) तर्फे आयोजित करण्यात आली होती. या यशाबद्दल कु. आरुषला पदक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. **कु. आरुष घाडी याचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!**

### बास्केटबॉल प्रो लीग साठी विद्यार्थ्यांची निवड

विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या खालील विद्यार्थिनींची दि. ६ ते १२ जुलै दरम्यान पुणे येथे होणाऱ्या बास्केटबॉल प्रो लीग साठी निवड झाली आहे -

१. कु. अनन्या मनोज पाटील- इ. १०वी
२. कु. लाइशा संजय ओबेरॉय- इ. ९वी

**कु. अनन्या पाटील व कु. लाइशा ओबेरॉय या विद्यार्थिनींचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!**

**इ. १०वी साठी समुपदेशन सत्र**

विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य वळण देण्यासाठी समुपदेशन उपयुक्त ठरते. याच उद्देशाने दि. १९ जुलै २०२५ रोजी विद्याभवन हायस्कूल नं. २ मध्ये समुपदेशन सत्र आयोजित करण्यात आले होते.

श्रीमती सायली चव्हाण यांनी समुपदेशिका श्रीमती अनिला गाडा यांची ओळख करून देत सत्राची सुरूवात केली. मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील तसेच उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर यांनी पुष्पगुच्छ देऊन श्रीमती अनिला गाडा यांचे स्वागत केले. श्रीमती अनिला गडा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी व्हिडिओ, चर्चा आणि कृती इत्यादींच्या माध्यमातून एकाग्रता आणि ध्येयावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी आवश्यक बाबी समजावल्या. विद्यार्थ्यांनी या सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हेड गर्ल कु. प्राची परब हिने मा. समुपदेशिका आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानले.

**वेलकम श्रावण**

श्रावण महिन्याचे आगमन होताच त्याच्या स्वागतासाठी विद्याभवन हायस्कूल नं. २ या निसर्ग मंडळातर्फे दि. २६ जुलै २०२५ रोजी एक अनोखी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ज्यामध्ये इ. ७वी आणि ८वी च्या विद्यार्थ्यांनी छत्र्यांवर रंगकाम करून पर्यावरण जागृती, निसर्गरक्षण इत्यादी विविध विषयांवर प्रदर्शनाच्या माध्यमातून आपले मंतव्य सादर केले. मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील तसेच उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर यांनी सदर प्रदर्शनाला भेट दिली व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. श्री. सुहास गरदडे यांनी परीक्षणाची जबाबदारी पार पाडली.

विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे:

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता/तुकडी |
|---|---|---|
| प्रथम | कु. इशिता पटेल | ८वी/अ |
| | कु. आरुषी देवी | ७वी/क |
| द्वितीय | कु. कशीष भुजबळ | ७वी/क |
| तृतीय | कु. ओवी धुमाळ | ८वी/ब |
| उत्तेजनार्थ | कु. पृथा राणे | ७वी/क |
| | कु. आर्या सरोदे | ८वी/अ |
| | कु. पूर्वा मेने | ८वी/अ |

सर्व विजेत्यांचे तसेच सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

**वृक्षरोपण मोहिम**

हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या मोहिमेअंतर्गत विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या निसर्ग मंडळातर्फे दि. २६ जुलै २०२५ रोजी वृक्षरोपण मोहिम राबविण्यात आली होती. इ. ५वी ते ८वी चे विद्यार्थी या मोहिमेत अत्यंत उत्साहाने सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी ५० रोपांची लागवड केली. मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर, श्री. निंबा पाटील यांनीही वृक्षरोपण करून विद्यार्थ्यांना निसर्ग संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

**कथाकथन स्पर्धा**

दि. २८ जुलै २०२५ रोजी अप्पासाहेब गरगटे सभागृहात इ. ५वी ते ६वी च्या विद्यार्थ्यांसाठी कथाकथन स्पर्धा घेण्यात आली.

सदर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी महाभारतकालीन ते दैनंदिन जीवनातील घडामोडी अशा विविध विषयांवर कथा सादर केल्या. स्पर्धेचे परीक्षण श्री. ज्ञानेश्वर धुमाळ आणि श्रीमती प्राजक्ता कांबळे यांनी केले. विजेत्या स्पर्धकांची नावे पुढीलप्रमाणे:

| विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक |
|---|---|
| कु. केंजळे स्वरा नितीन | प्रथम |
| कु. कणसे स्वरूपा गणेश | द्वितीय |
| कु. गायकर शौर्य गणेश | तृतीय |

### इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा

दि. ३१ जुलै २०२५ रोजी इ. ५वी व ६वी, लहान गटासाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. श्रीमती नीरज सिंह आणि श्रीमती कोकिळा थोरात यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे -

| विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक |
|---|---|
| कु. गायकर शौर्य गणेश | प्रथम |
| कु. महाडिक सिद्धी समीर | द्वितीय |
| कु. पडवळ हर्षवर्धिनी किरण | तृतीय |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

### कुस्ती खेळात विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या विद्यार्थ्याची यशस्वी कामगिरी

बुधवार दि. १३ ऑगस्ट २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथी निमित्त कुस्तीगिर खाशाब जाधव क्रीडा महाकुंभ २०२५ ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या इंग्रजी माध्यमाचा विद्यार्थी कु. साईराज दिलीप येळवे इ. ८वी अ या विद्यार्थ्यांने कुस्ती (U-१४) या स्पर्धेत सहभाग घेऊन तृतीय क्रमांक पटकावला. **कु. साईराज येवळे याचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**



कु. साईराज येळवे

### आदर्श शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार

विद्याभवन हायस्कूल नं. २ चे शिक्षकेतर कर्मचारी श्री. बाळू देवराम भालेराव यांना स्वातंत्रदिनी दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी 'आदर्श शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. सदर पुरस्कार संस्थेच्या देणगीदार श्रीमती रश्मी अरविंद जोशी यांच्या मातोश्री कै. पुष्पा श्रीपाद करंदीकर यांच्या पुण्यस्मरणार्थ दिला जातो. श्री. बाळू भालेराव हे अतिशय प्रामाणिक व कर्तव्यदक्ष कर्मचारी असून त्यांना नेमून दिलेली कामे ते नेहमीच व्यवस्थित पार पाडतात. प्रमुख पाहूणे श्री. कुमार पिल्ले, उपाध्यक्ष रोटरी क्लब ऑफ घाटकोपर, यांनी श्री. बाळू भालेराव यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व रोख पारितोषिक देऊन गौरव केला.

***

**✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ✻**



**नागदेवतेला वंदन करताना समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव समवेत सर्व शिक्षका वृंद**

## ∗ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ∗



'आदर्श शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार' प्रमुख पाहुणे श्री. कुमार पिल्ले यांच्या हस्ते स्वीकारताना विद्याभवन हायस्कूल नं. २ चे कर्मचारी श्री. बाळू भालेराव, समवेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, माजी कार्याध्यक्ष श्री. कृ. ना. शिरकांडे




शाळेतील मंत्रीमंडळ शपथविधी कार्यक्रमात निवडून आलेले विद्यार्थी हेड गर्ल कु. कैरवी मोरे व हेड बॉय कु. सात्विक गायकर यांना शुभेच्छा देताना मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत व समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव



जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धेतील विजेता खेळाडू कु. आरुष घाडी




स्वातंत्र्य दिन सोहळा समारंभ साजरा करताना पूर्व प्राथमिक इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी

**✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ✻**




दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी प्रमुख पाहुणे श्री. कुमार पिल्ले यांचे स्वागत करताना कार्यध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत डावीकडून प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, माजी कार्याध्यक्ष श्री. कृ. ना. शिरकांडे, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन, श्रीमती शुभांगी जाधव




'मोबाईल जनजागृती' या विषयावर नाटिका सादर करताना सहा. शिक्षिका श्रीमती पूजा शिवानी, श्रीमती गौतमी गोखले, श्रीमती जसलिन देठे, श्रीमती रश्मी दुबे



विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई, सहा. शिक्षिका श्रीमती मानसी विचारे, श्रीमती सुनिता वायकर, श्रीमती मीनल भोळे व श्री. अर्जुन मस्के

# कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक

**उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल म. जोशी**
**मुख्याध्यापक : श्री. ज्ञानेश्वर निंबेकर**

### गुरूवर्य कै. डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर जयंती

दि. १५ जून २०२५ रोजी शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षक वृंद यांनी पूजन केले.

मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी कै. डॉ. अण्णासाहेब खैर यांच्या कार्याची माहिती उपस्थितांना सांगितली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. तेजश्री जोशी यांनी केले आणि श्री. मंडले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### नवागतांचे स्वागत व पाठ्यपुस्तक वितरण समारंभ

दि. १६ जून २०२५ रोजी विद्यालयात नवागतांचे स्वागत व पाठ्यपुस्तक वितरण सोहळा संपन्न झाला. या प्रसंगी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांचे चॉकलेट, पाठ्यपुस्तक आणि गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. सर्व मान्यवरांचा उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी अध्यक्षीय मनोगतामध्ये विद्यार्थ्यांना 'छान रहा, मस्त अभ्यास करा' असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी केले. सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले. उपस्थितांचे आभार श्री. तुकाराम मंडले यांनी मानले. या प्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर वृंद उपस्थित होते.

### आंतरराष्ट्रीय योग दिन

दि. २१ जून २०२५ रोजी विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी Triangle योगा या संस्थेचे मा. श्री. राज बंबानी व श्री. अभिजित पुरी यांनी योगासनांचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांकडून करून घेतले. यावेळी विद्यालयातील सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी योगासने केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी दैनंदिन जीवनातील योग, प्राणायाम, ध्यानधारणा इत्यादीचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. गौरव झुरडे यांनी केले. उपस्थितांचे आभार सौ. अस्मिता बावधनकर यांनी मानले. सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले.

### छत्रपती शाहू महाराज जयंती

दि. २६ जून २०२५ रोजी विद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे आणि सर्व शिक्षक वृंदांनी शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. शिक्षक श्री. तुकाराम मंडले यांनी शाहू महाराजांचे सामाजिक, शैक्षणिक जीवन कार्याविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी शाहू महाराजांच्या जीवनातील विविध प्रसंग कथन केले. श्री. गौरव झुरडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सौ अस्मिता बावधनकर यांनी आभार मानले.

### आषाढी एकादशी

दि. ५ जुलै २०२५ रोजी आषाढी एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी हे उपस्थित होते. पालखी व विठ्ठल - रूक्मिणी मूर्तीचे पूजन करण्यात आले. शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना आषाढी वारीचे धार्मिक, पौराणिक महत्त्व सांगितले. विद्यालय ते गंगा घाट पटांगण या मार्गे विठू माऊलीचा जयघोष करत दिंडी काढण्यात आली.

गंगा घाट येथे ढोल आणि लेझीमच्या तालावर रिंगण सोहळा घेण्यात आला. फेर धरून, फुगड्या खेळून विठू माऊलीच्या नामाचा गजर करण्यात आला. इ. ५वी ते इ. १०वीच्या विद्यार्थ्यांची अभंग, भजन स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्साहाने विठ्ठलाचे भजन सादरीकरण केले. या कार्यक्रमात मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थी सहभागी झाले. दिंडीतून पर्यावरण संरक्षण, वृक्षांचे महत्त्व याविषयी जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. तेजश्री जोशी यांनी केले. आभार श्रीमती अर्चना केकाण यांनी मानले.

**गुरूपौर्णिमा**

दि. १० जुलै २०२५ रोजी गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षक वृदांने महर्षी व्यासांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. शिक्षिका श्रीमती अर्चना केकाण यांनी विद्यार्थ्यांना गुरू - शिष्यांच्या विविध कथा आणि गुरूपौर्णिमेचे धार्मिक, अध्यात्मिक महत्त्व सांगितले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी सर्व गुरूजनांचा सत्कार केला. गुरूंचे महत्त्व सांगून गुरूपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले उपशिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी आभार मानले.

**नागपंचमी**

दि. २९ जुलै २०२५ रोजी नागपंचमी उत्साहात साजरी करण्यात आली. जेष्ठ शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी नागपंचमी या सणाचे धार्मिक, पौराणिक महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी सर्पमित्र, सापांच्या विविध जाती इत्यादीविषयी माहिती सांगितली. सर्वांना नागपंचमीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले.

**आरोग्य तपासणी**

दि. ३१ जुलै २०२५ रोजी संस्था आणि आयुष बाल रूग्णालय यांचे संयुक्त विद्यमाने एक दिवसीय मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात संस्थेतील २०० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच मोफत औषधे देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. आयुष बाल रूग्णालयाचे प्रशांत धुमाळ, श्री. अक्षय डांगळे, डॉ. तन्मय अहिरराव, डॉ. मयुरी राउत आणि त्यांचे सहकारी आरोग्य मित्र तुषार जगताप, जयश्री जगताप, रोहिणी आहेर, प्रीती नरोडे यांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून मार्गदर्शन केले. सौ. तेजश्री जोशी यांनी सूत्रसंचालन केले. श्रीमती अर्चना केकाण यांनी आभार मानले

**देणगी वृत्त**

दि. १० जुलै २०२५ रोजी विद्यालयात रोटरी क्लब ऑफ नाशिक नॉर्थ यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना शूज चे वाटप करण्यात आले. यावेळी रोटरी क्लबचे प्रेसिडेंट मा. श्री. चांडक, सेक्रेटरी मा. श्री. साखरे, मा. श्री. मिर्झा, मा. श्री. समीर शहा व मा. सौ शहा आणि रोटरीचे इतर मा. पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी श्री. चांडक यांनी रोटरी क्लबच्या कार्याची माहिती उपस्थितांना दिली.

श्री. समीर शहा यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी रोटरीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे शाल व गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. उपस्थितांना संस्थेच्या कार्याची माहिती दिली व रोटरी क्लबने केलेल्या मदतीबद्दल ऋण व्यक्त केले. यानंतर विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना शूजचे वाटप रोटरी पदाधिकारी यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व अतिथींचा परिचय उपशिक्षिका सौ. तेजश्री जोशी यांनी करून दिला. उपस्थितांचे आभार ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी मानले. या कार्यक्रमास सर्व विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेतर वृंद उपस्थित होते.

**क्रांती दिन आणि जागतिक आदिवासी दिन**

दि.९ ऑगस्ट २०२५ रोजी जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षक वृंदांनी लोकनायक बिरसा मुंडा यांचे प्रतिमापूजन करून अभिवादन केले. इ. ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण भाषणे केली. शिक्षक श्री. तुकाराम मंडले यांनी आदिवासी दिनाचे महत्त्व सांगितले आणि क्रांतिकारकांचे कार्य सांगितले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी स्वतंत्र संग्रामातील क्रांतिकारकांचे योगदान आणि आदिवासी संस्कृती, परंपरा आणि पर्यावरण संरक्षण इत्यादी कार्याविषयी माहिती सांगितली. आदिवासी दिनानिमित्त वेशभूषा आणि नृत्यस्पर्धा घेण्यात आल्या. नृत्य स्पर्धेचे परिक्षण श्री. गौरव झुरडे आणि श्री. भालचंद्र कुलकर्णी यांनी केले. नृत्य स्पर्धा आणि वेशभूषा स्पर्धेत बक्षीस प्राप्त विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे

**वेशभूषा स्पर्धा छोटा गट**

| **विद्यार्थ्याचे नाव** | **इयत्ता** |
|---|---|
| कु. यशराज कुमार गायकवाड | सहावी |
| कु. आदित्य धांडे | आठवी |

**वेशभूषा स्पर्धा मोठा गट**

| | |
|---|---|
| १.योगेश भोये | दहावी |
| २.साई पाटील | दहावी |

**रक्षाबंधन**

दि. ९ ऑगस्ट २०२५ रोजी राखी पौर्णिमा साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी श्रीनिनाथ जगताप, श्रीमती नमना देशमुख विवेकानंद केंद्र कन्याकुमारी प्रशिक्षण सेवा प्रकल्प, पिंपळकर आनंदा, प्रमुख श्री. राजेंद्र रामचंद्र वैद्य, स्वयंसेवक श्री. स्वरूप अत्रे व श्री. प्रदीप भानुसे इत्यादी प्रमुख अतिथी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते. प्रमुख अतिथी श्रीमती नमना देशमुख यांनी विद्यार्थ्यांना रक्षाबंधन या सणाचे धार्मिक, अध्यात्मिक महत्त्व सांगितले. विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले.

**अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी**

दि. १३ ऑगस्ट २०२५ रोजी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षक वृंद यांनी प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी पुण्यश्लोक आहिल्याबाई यांनी हिंदू धर्म टिकवण्यासाठी मुघल साम्राज्य विरोधात दिलेला लढा आणि त्यांचे कार्य व विचार याविषयी विचार मांडले.

**स्वातंत्र्य दिन**

दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी भारत देशाचा ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांचे शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांचे स्वागत आणि सत्कार केला. श्री. गौरव झुरडे यांनी 'अमली पदार्थ मुक्त भारत' या प्रतिज्ञेचे अभिवाचन केले. उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी इ. ८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या ''आम्ही घडलो वाचनाने'' या हस्तलिखित अंकाचे प्रकाशन केले. टाटा बिल्डिंग इंडिया तर्फे घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धांतील बक्षीस पात्र विद्यार्थ्यांना मेडल आणि प्रशस्तीपत्रक देऊन कौतुक करण्यात आले. सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर केले. संगीत कवायत सादरीकरण करण्यात आले. पंचवटी परिसरात प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीत देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या. सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास किंडर गार्डन स्कूलच्या सर्व शिक्षिका, सर्व संस्था कर्मचारी आजी माजी विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी केले. ***

## ❊ कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक ❊



दि. ५ जुलै २०२५ रोजी आषाढी एकादशीनिमित्त आयोजित दिंडी प्रसंगी उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, समवेत मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे, सौ. तेजश्री जोशी आणि विद्यार्थी




दि. ३१ जुलै २०२५ रोजी आयोजित एक दिवसीय मोफत आरोग्य तपासणी शिबिराची माहिती देताना उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी समवेत आयुष बाल रूग्णालयाचे पदाधिकारी आणि डॉक्टर




दि. १० जुलै २०२५ रोजी रोटरी क्लब ऑफ नाशिक नॉर्थ यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना शूज वाटप प्रसंगी रोटरी क्लबचे प्रेसिडेंट श्री. चांडक, सेक्रेटरी श्री. साखरे, श्री. मिर्झा, श्री. समीर शहा व सौ शहा, रोटरीचे इतर मा. पदाधिकारी यांच्या समवेत मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ-नाशिक पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभाग

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. प्रतिमा वैद्य**

## पूर्व प्राथमिक विभाग

### आषाढी एकादशी

दि. ४ जुलै २०२५ रोजी आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त काही विद्यार्थी श्री विठ्ठलाच्या आणि काही विद्यार्थिनी श्री रूक्मिणीच्या वेशात तसेच अनेक विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांच्या वेशभूषा परिधान केल्या होत्या. पारंपरिक पद्धतीने काढण्यात आलेल्या पालखी सोहळ्यामध्ये व दिंडीमध्ये सर्व विद्यार्थी आनंदाने सहभागी झाले. टाळ व मृदुंगाच्या गजरात वारकरी विद्यार्थी ''विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल'' या नामघोषात हा दिवस साजरा केला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विठ्ठल रूक्मिणीची माहिती सांगितली. यावेळी विठ्ठल - रूक्मिणीच्या प्रतिमांची पूजा करण्यात आली.

### गुरूपौर्णिमा उत्सव

दि. १० जुलै २०२५ रोजी गुरूपौर्णिमा साजरी करण्यात आली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आयुष्यातील गुरूचे महत्त्व सांगितले. आपले आई वडील हे आपले प्रथम गुरू असतात. आपले शिक्षक हे आपले गुरू असतात. प्रत्येकाच्या आयुष्यात गुरूचे स्थान किती श्रेष्ठ आहे हे विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांना पुष्प देऊन अभिवादन केले. या दिवशी वर्गात वेगवेगळे उपक्रम राबवण्यात आले.

### पालक शिक्षक सभा

दि. १२ जुलै २०२५ रोजी पालक शिक्षक सभा घेण्यात आली. मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांच्या हस्ते सरस्वती पूजन करून सभेला सुरूवात झाली. सभेत सौ. प्रतिमा वैद्य यांनी पालकांना मार्गदर्शन केले. तसेच शाळेच्या नियमांचे पालन करावे, शिक्षकांना सहकार्य करावे, असे पालकांना आवाहन केले.

### चिन्मय गीता पठण स्पर्धा

दि. २५ जुलै २०२५ रोजी 'चिन्मय गीता पठण स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. यावेळी पठणासाठी भगवद्‌गीतेमधील पंधरावा अध्याय घेण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सौ. सुजाता तुलंगेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### वृक्ष बीज रोपण उपक्रम

दि. २५ जुलै २०२५ रोजी बीज रोपण उपक्रम राबवण्यात आला. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या बिया आणि काही विद्यार्थ्यांनी छोटी रोपे आणून कुंडीत लावली. या उपक्रमातून विद्यार्थी निसर्गाशी जोडले गेले. विद्यार्थ्यांना झाडे लावण्याचे महत्त्व, उपयुक्तता कळली.

## प्राथमिक विभाग

### हस्ताक्षर स्पर्धा

दि. २८ जून २०२५ रोजी इ. १ ली ते इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या हस्ताक्षर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे विजेते पुढीलप्रमाणे -

| इयत्ता | विद्यार्थ्यांचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| १ली | कु. समीक्षा प्रमोद धाकतोडे | प्रथम |
| | कु. जैनिक प्रीतम मांडविया | द्वितीय |
| | कु. रुद्राणी भदाणे | तृतीय |
| २री व ३री | कु. तारा कमलेश म्हसकर | प्रथम |
| | कु. मृण्मयी सागर पुरकर | द्वितीय |
| | कु. शिवांश गणेश नवले | तृतीय |
| ४थी व ५वी | कु. अंशी अखिलेश बिंद | प्रथम |
| | कु. सिया विजय साळवे | द्वितीय |
| | कु. आराध्या निलेश भोर | तृतीय |

| | | |
|---|---|---|
| ६वी व ७वी | कु. प्रांजळ आघाव | प्रथम |
| | कु. ईश्वरी गांगुर्डे | द्वितीय |
| | कु. आराध्या तेलोरे | तृतीय |

**आषाढी एकादशी पालखी सोहळा**

दि. २८ जून २०२५ रोजी महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल माऊलीच्या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सर्व विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा धारण केली होती. मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील आणि सौ. प्रतिमा वैद्य यांनी विठ्ठल रूक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला.

शिक्षिका सौ. माधुरी अहिरे यांनी आषाढी एकादशी व वारीचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. इ. ५वी ते इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल रखुमाई चे गीत सादर केले. तसेच इ. ४थी ते इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. यावेळी इ. २री - ३री चे विद्यार्थी श्री विठ्ठल व विद्यार्थिनी श्री रखुमाईच्या वेशभूषेत आले होते. त्यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.

विठूरायाची पालखी मिरवणूक, टाळांच्या गजराने आणि विठ्ठल नामाच्या जयघोषाने शाळेचा परिसर दुमदुमला. शाळेतील सर्व विद्यार्थी, मुख्याध्यापिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी हरिनामाच्या गजरात पालखी सोहळ्यात सामील झाले.

**कौतुकास्पद वार्ता**

दि. २९ मार्च २०२५ रोजी घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय इंग्लिश मॅरेथॉन परीक्षेचा निकाल जून २०२५ मध्ये घोषित करण्यात आला. इ. १ली ते इ. ७वीचे एकूण ११३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यातील ८६ विद्यार्थ्यांनी पदके मिळवली.

**गुरूपौर्णिमा**

''गुरू हाच परीस आहे. ज्यांचा स्पर्श होताच आपल्या आयुष्याचे सोने होते.'' ही उक्ती सार्थ करीत दि. १० जुलै २०२५ रोजी शाळेत गुरूपौर्णिमा साजरी करण्यात आली.

मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी महर्षी व्यास यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन केले. शिक्षिका सौ. मंगला गाडे यांनी गुरूपौर्णिमेची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. तसेच इ. ४थी व इ. ६वीच्या विद्यार्थ्यांनी गुरू शिष्याची माहिती सांगितली. तसेच इ. १ली ते इ. ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी गुरूपौर्णिमेनिमित्त इयत्तानुसार उपक्रम राबविण्यात आले. यात इ. १ली - भेटकार्ड, इ. २री - फूल बनविणे, इ. ३री- भेटकार्ड बनविणे, इ. ४थी - भेटकार्ड पालकांसाठी, इ. ५वी - फूल बनविणे, इ. ६वी - कथा (गुरूशिष्य) पोस्टर, इ. ७वी - तक्ता बनविणे, प्राचीन गुरूंची माहिती इत्यादी उपक्रमांचा समावेश होता.

**अभिनंदनीय**

*** उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती निकाल**

दि. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेची गुणवत्ता यादी दि. १० जुलै २०२५ रोजी प्रसिद्ध झाली. या यादीत आपल्या शाळेतील इ. ५वीचे एकूण ६२ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट होते. खालील चार विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे.

| विद्यार्थ्याचे नाव | गुणवत्ता यादी क्रमांक |
|---|---|
| कु. हंसिका सोनवणे | १३ |
| कु. रियांश पवार | १३३ |
| कु. ईश्वरी गांगुर्डे | २६७ |
| कु. किमया चौधरी | ३०० |

* नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ करिअर एज्युकेशन फाऊंडेशनद्वारे राष्ट्रीय स्कॉलरशिप परीक्षा घेतली जाते. त्यात विद्यार्थिनी कु. हंसिका सोनवणे, इ. ५वी ही २०० पैकी १८० गुण मिळवून उत्तीर्ण झाली.

* जिम्नॅस्टिक आणि एरोबिक्स जिल्हा निहाय स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी पुढील प्रमाणे -

| विद्यार्थिनीचे नाव | इयत्ता | पदक |
|---|---|---|
| कु. जान्हवी धिवरे | ७वी | सुवर्ण (trio) रौप्य (वैयक्तिक) |
| कु. आराध्या दिवेकर | ६वी | सुवर्ण (trio) सुवर्ण (मिक्स) सुवर्ण (वैयक्तिक), |
| कु. मृण्मयी दीक्षित | ६वी | सुवर्ण (वैयक्तिक) सुवर्ण (trio), |
| कु. आरवी कदम | ६वी | कांस्य (वैयक्तिक), |
| कु. राशी शौचे | ७वी | सुवर्ण (trio) |

❋ 'मंथन' या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेमध्ये शाळेतील दहा विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.

**या सर्व विद्यार्थ्यांचे कार्यवाह श्री. संजय गुंजाळ व मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी अभिनंदन केले.**

**पालक शिक्षक संघ स्थापना**

दि. १२ जुलै २०२५ रोजी सर्व वर्गांसाठी पालक सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी वर्ष २०२५-२६ साठी पालक शिक्षक संघ, माता पालक समिती, विशाखा समिती आणि परिवहन समिती सदस्यांची निवड करण्यात आली.

**लोकमान्य टिळक जयंती**

दि. २३ जुलै २०२५ रोजी लोकमान्य टिळक जयंती साजरी करण्यात आली. शिक्षिका सौ. सोनल अमृतकर यांनी त्यांच्या स्वातंत्र्य लढा विषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली.

**एक पेड मां के नाम**

जुलै २०२५ मध्ये महाराष्ट्र व भारत सरकारतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण पूरक उपक्रम राबविण्यात आला. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आईच्या नावाने एक रोपटे लावून त्या रोपट्याचे जतन करावे अशी संकल्पना या मागे होती. विद्यार्थ्यांनी रोपटे लावून त्यांच्या आईसोबत फोटो काढले.

**इंग्लिश वक्तृत्व स्पर्धा**

दि. २६ जुलै २०२५ रोजी इंग्लिश वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. वक्तृत्व स्पर्धेचे विषय खालीलप्रमाणे होते.

**इयत्ता ४ थी**

१) The value of friendship

२) The importance of saving water

**इयत्ता ५ वी**

१) The Joy of Reading and its benefits

२) Teacher's role in our life.

**इयत्ता ६ वी**

१) How technology affects us

२) Save the earth, save the life

**इयत्ता ७ वी**

१) Poor health begins in the mind

२) Artificial intelligence, its impact on society

स्पर्धेचे विजेते खालीलप्रमाणे,

**इ. ४थी व इ. ५वी**

| विद्यार्थिनीचे नाव | इयत्ता |
|---|---|
| कु. शिवानी चव्हाण | ५वी |
| कु. रितिका कुलकर्णी | ४थी |
| कु. सर्वज्ञा थोरात इ | ४थी |

**इ. ६वी व इ. ७वी**

| | |
|---|---|
| कु. मनस्वी वडजे | ७वी |
| कु. हंसिका सोनवणे | ६वी |
| कु. धनश्री गायकवाड | ७वी |

**डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम पुण्यतिथी**

दि. २८ जुलै २०२५ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथी निमित्त मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करून आदरांजली वाहिली. शिक्षिका सौ. संगीता मोरे यांनी विद्यार्थ्यांना डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या महान कार्याची माहिती दिली. विद्यार्थ्यांना आपल्या स्वप्नपूर्ती साठी प्रोत्साहित केले.❋

## ✲ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ शाखा, नाशिक ✲



दि. ४ जुलै २०२५ रोजी आषाढी एकादशी साजरी करताना बालचमू



दि. २५ जुलै २०२५ रोजी बीज रोपण उपक्रम प्रसंगी छोटी रोपे लावताना विद्यार्थी



दि. २५ जुलै २०२५ रोजी आयोजित चिन्मय गीता पठण स्पर्धेच्या प्रमुख पाहुण्या सौ. सुजाता तुलंगेकर यांच्या समवेत विद्यार्थी

### उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती निकाल २०२५



कु. हंसिका सोनवणे
जिल्हा यादी क्रमांक १३



कु. रियांश पवार
जिल्हा यादी क्रमांक १३३



कु. ईश्वरी गांगुर्डे
जिल्हा यादी क्रमांक २६७



कु. किमया चौधरी
जिल्हा यादी क्रमांक ३००

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक

## माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : श्रीमती भारती पाटील**

### विद्यार्थी संसद शपथविधी सन २०२५-२६

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या सत्रासाठी विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित व्हावेत कर्तव्य व जबाबदारीची जाणीव व्हावी या उद्देशाने विद्यार्थी परिषद स्थापनेचा समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. हा समारंभ विद्यार्थ्यांच्या नेतृत्व क्षमतेचा सन्मान करणारा आणि शाळेच्या शिस्तीचे प्रतीक दर्शवणारा ठरला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कार्यवाह श्री. संजय गुंजाळ आणि प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांचा सत्कार मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. शिक्षिका दीपा गुरनानी यांनी प्रास्ताविक केले. प्रथम मागील वर्षाच्या विद्यार्थी परिषदेचे विसर्जन झाले. तसेच मागील वर्षाच्या विद्यार्थी संघटनेच्या प्रतिनिधींनी परिषदेचे प्रतीक असलेले रेड, येलो, ग्रीन, ब्ल्यू हाऊसचे झेंडे नव्याने नियुक्त झालेल्या प्रतिनिधींना देऊन संघटनेच्या जबाबदारीचे हस्तांतरण केले. समारंभाचा महत्त्वाचा भाग म्हणजे पिनिंग सेरेमनी. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थी परिषदेला बिल्ला व सॅशे प्रदान केले. तसेच माजी परिषद विद्यार्थ्यांनी आपल्या कार्यकाळातील अनुभव शेअर करत आपली कृतज्ञता व्यक्त केली. यानंतर नवनिर्वाचित हेड बॉय कु. तीर्थराज मोरे याने एक प्रेरणादायी भाषण करत नेतृत्व, जबाबदारी व ऐक्य यावर भर दिला. हेड गर्ल कु. संजीवनी खलाणे हिने सर्व नवनियुक्त प्रतिनिधींच्या वतीने शपथ घेतली व आपल्या कर्तव्याची पूर्ण निष्ठेने पूर्तता करण्याचे वचन दिले.

प्रमुख पाहुणे यांनी नियुक्तांचे अभिनंदन केले तसेच कर्तव्य पार पाडताना निःपक्ष व प्रामाणिक राहण्याचा सल्ला दिला. हेड गर्ल कु. संजीवनी खलाणे हिने आभार प्रदर्शन करत सर्व शिक्षक, मान्यवर व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

### पालक शिक्षक संघाची स्थापना २०२५-२६

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी कार्यकारी पालक शिक्षक संघाची स्थापना करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांनी उपस्थित पालक व शिक्षकांचे उद्बोधन केले. मुख्याध्यापकांनी पालकांशी संवाद साधत कार्यकारी पालक शिक्षक संघटनेचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, ''पालक व शिक्षक यांच्यातील नियमित खुले संवाद विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहेत. कार्यकारी पालक शिक्षक संघटना (PTA) ही केवळ समिती नसून शाळा व पालक यांच्यातील विश्वास व सहकार्य दृढ करणारा एक महत्त्वाचा दुवा आहे.'' मागील वर्षाच्या पालक शिक्षक संघटनेच्या सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी शाळा व्यवस्थापनाने दिलेल्या संधीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आणि शाळेच्या विकासात योगदान देण्याची संधी लाभल्याचा आनंद व्यक्त केला.

पालक प्रतिनिधींची निवड सर्वांच्या संमतीने लोकशाही पद्धतीने करण्यात आली. तसेच वर्ग प्रतिनिधी व शिक्षक प्रतिनिधी देखील निवडण्यात आले. मुख्याध्यापिकांनी सर्व नवनिर्वाचित सदस्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. ***

**आपला पत्ता बदललेला आहे का?**

**समाचार संदर्भातील आपला बदललेला पत्ता त्वरित कळवावा ही विनंती.**

**पत्ता कळविताना जुना व नवा दोन्ही पिन कोड तसेच आपला ईमेल आयडी सुध्दा कळवावा म्हणजे आपणास ई-समाचार पाठविणे सोईचे होईल.**

pvgsamachar@gmail.com
**या ईमेल आयडी वर कळवावे.**

**संपादक**

### ❊ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ शाखा, नाशिक ❊




विद्यार्थी संसद शपथविधी सन २०२५-२६ प्रसंगी प्रमुख पाहुणे कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य, मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील आणि विद्यार्थी प्रतिनिधी

### ❊ संस्था मुख्यालय, पुणे ❊




आश्रम वसतिगृह, पुणे सन १९९४ - ९५ बॅचच्यावतीने वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या वापरासाठी ६ नवीन मोठ्या सतरंज्या देणगी देण्यात आल्या. याप्रसंगी उपस्थित संचालक श्री. रमेश कुलकर्णी, माजी विद्यार्थी श्री. अमोल भुजबळ, श्री. अभिजित पाठक, श्री. महेंद्र शिंदे, संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी आणि आश्रमस्थ विद्यार्थी

# पंचवटी शाखा, नाशिक

**उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल म. जोशी**

## आसावरी सेठ चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई तर्फे आश्रम वसतिगृहास अन्नधान्य वाटप

आसावरी सेठ चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांचेतर्फे पंचवटी, नाशिक येथील आश्रम वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी कोरडा शिधा आसावरी सेठ चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक मंडळातील सदस्य श्री. मुकुंद देशमुख, हितचिंतक श्री. आत्माराम तोरस्कर, श्री. निशांत शेठ व श्री. श्रीरंग वैद्य, यांच्या व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांच्याकडे देण्यात आला. यामध्ये तांदूळ, गहू, वेगवेगळ्या डाळी, तेल, साखर, मसाले, शेंगदाणे आदी जीवनावश्यक वस्तूंचा समावेश आहे. यावेळी उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी सर्वांचे स्वागत करून संस्थेच्या वतीने आभार व्यक्त केले. वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणासाठी या उपक्रमाचा नक्कीच उपयोग होणार असल्याचे उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी सांगून यापुढेही ट्रस्टच्या सर्व पदाधिकारी यांनी सामाजिक कार्याची मालिका चालू ठेवावी असे सांगितले. ट्रस्टच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. सर्वांनी आश्रम वसतिगृहातील नियमांचे पालन करून सर्व विषयांचा सखोल अभ्यास करावा आणि जीवनात उच्च ध्येय मनात ठेवून उत्तम यश संपादन करावे असेही सांगितले. याप्रसंगी सर्व कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

***

*** पंचवटी शाखा, नाशिक ***




**मुंबई येथील आसावरी सेठ चॅरिटेबल ट्रस्ट यांचेतर्फे पंचवटी, नाशिक येथील आश्रम वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी अन्नधान्य दान प्रसंगी श्री. मुकुंद देशमुख, श्री. आत्माराम तोरस्कर, श्री. निशांत शेठ, श्री. श्रीरंग वैद्य, आश्रम वसतिगृहाचे संचालक तथा उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी आणि विद्यार्थी**

# श्रीराम सदाशिव धामणकर वाणिज्य, विज्ञान आणि कला महाविद्यालय, म्हसरूळ शाखा, नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**

**प्राचार्य : डॉ. एस. जी. वाकचौरे**

## नवीन शैक्षणिक धोरण २०२० आणि वाणिज्य शाखेतील संधी एक दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन

दि. २३ जुलै २०२५ रोजी विद्यार्थ्यांसाठी ''NEP २०२०आणि वाणिज्य शाखेतील संधी'' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. धीरज झाल्टे आणि प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. डॉ. धीरज झाल्टे यांनी NEP २०२० या शैक्षणिक धोरणाविषयी सखोल मार्गदर्शन केले. तसेच वाणिज्य क्षेत्रातील उपलब्ध असलेल्या संधी आणि नवीन धोरणामुळे कोणत्या संधी उपलब्ध होणार आहेत याविषयी मार्गदर्शन केले. या प्रसंगी वाणिज्य विभागप्रमुख प्रा. प्रतिभा रायते यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, सर्व शिक्षक आदींसह वाणिज्य शाखेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता चोपडेकर यांनी केले. उपस्थितांचे आभार माधुरी शिर्के यांनी मानले.

## विद्यार्थिनींसाठी व्यक्तिमत्त्व समृद्धी आणि निरोगीपणा याविषयावर सत्राचे आयोजन

दि. २५ जुलै २०२५ रोजी अंतर्गत समिती व ब्रॅन्ड टच आणि अॅनॅलिटिक्स कंपनी लिमिटेड, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनी व महिला शिक्षकांसाठी 'व्यक्तिमत्त्व समृद्धी आणि निरोगीपणा' या विषयावर एक दिवसीय सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्राचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे तसेच कार्यक्रमाच्या प्रमुख व्याख्याता व प्रशिक्षक तानिया अरोरा यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थिनींना आरोग्याविषयी येणाऱ्या अडचणी, स्वत:ची काळजी, तसेच वैयक्तिक सौंदर्य आणि व्यावसायिक शिष्टाचार, निरोगी राहण्यासाठी असणारे उपाय याविषयी प्रशिक्षक तानिया अरोरा यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात आरोग्याविषयी व्हिडीओ क्लिप्स दाखवण्यात आल्या. उपस्थित विद्यार्थिनींना तसेच महिला शिक्षकांना व्हिस्पर इंडिया कंपनी तर्फे कंपनीचे वैयक्तिक काळजी उत्पादन नमुने देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता चोपडेकर यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रदर्शन प्रणाली होळकर यांनी मानले.

## अँटी रॅगिंग सप्ताह उत्साहात साजरा

दि. १२ ऑगस्ट २०२५ हा राष्ट्रीय अँटी रॅगिंग दिवस साजरा केला जातो. दि. १२ ते १८ ऑगस्ट हा कालावधी अँटी रॅगिंग सप्ताह म्हणून साजरा केला जातो. महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण मंडळ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, विभागीय केंद्र नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात दि. १३ ऑगस्ट २०२५ रोजी अँटी रॅगिंग दिवस साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अतिथींचे स्वागत डॉ. एस. आर. निकम यांनी केले. प्रमुख मार्गदर्शन श्री. मनोज घंटे यांनी केले. या कार्यक्रमात मराठा विद्या प्रसारक समाजाच्या विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य मा. डॉ. संध्या गडाख या प्रमुख वक्त्या होत्या. त्यांनी अतिशय सुरेख पद्धतीने रॅगिंगचे दुष्परिणाम सांगून ते समाजाला कसे घातक आहे हे पटवून सांगितले. त्याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांकडून शपथ देखील घेतली की मी रॅगिंग करणार नाही व कोणावर होऊ देणार नाही. वक्त्यांच्या मार्गदर्शनानंतर रॅगिंग संदर्भातील चित्रफित विद्यार्थ्यांना दाखवून त्यांच्यात जागृती देखील करण्यात आली.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. जी. वाकचौरे, अँटी रॅगिंग समितीचे सचिव श्री. मनोज घंटे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे वरिष्ठ शैक्षणिक

सल्लागार डॉ. एस. आर. निकम हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी डॉ. हेमांगिनी पाटील यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस. एन. चोपडेकर यांनी केले तर आभारप्रदर्शन श्री अंकुश गोधडे यांनी केले. एकूण १२५ विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी होते.

**महाविद्यालयाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा**

पुणे विद्यार्थी गृहाच्या श्रीराम सदाशिव धामणकर वाणिज्य विज्ञान व कला महाविद्यालयाचा अठरावा वर्धापन दिन, संस्थेचे देणगीदार स्वर्गीय श्रीराम सदाशिव धामणकर यांच्या जयंतीदिनी उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती सिंधूताई धामणकर, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ आणि उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी चित्रफितीच्या माध्यमातून महाविद्यालयाच्या अठरा वर्षांच्या काळातील प्रमुख घडामोडींचा आढावा घेतला. त्यांनी संस्था महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्नशील असल्याचे मनोगतात व्यक्त केले. देणगीदार श्रीमती सिंधुताई धामणकर यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी ''संस्थेच्या पदाधिकारी व शिक्षकांच्या मेहनतीतून महाविद्यालयाची प्रगती साध्य झालेली असून विद्यार्थ्यांनी जीवनातील सर्वोत्तम अध्ययन काळाचा आनंद घेत प्रगतीचे शिखर गाठावे'', असा महत्त्वपूर्ण विचार व्यक्त केला. उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी विद्यार्थ्यांना संदेश देताना म्हटले की, ''कोणत्याही परिस्थितीत आपले ध्येय न सोडता परिस्थितीला चांगल्या पद्धतीने हाताळले तर संकटं दूर होतात. तसेच विद्यार्थ्यांनी मनात न्यूनगंड न ठेवता महाविद्यालयात आयोजिलेल्या उपक्रमांत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे'' असे आवाहन केले.

महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनी कु. मनीषा जाधवने महाविद्यालयाच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच कु. नुपूर बोरस्ते, कु. शुभम साबळे, कु. नंदिनी तांदळे, कु. मनाली गायकवाड, कु. भूषण ठाकूर या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रम व स्मृतींना उजाळा देत महाविद्यालास पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रा. डॉ. हेमांगिनी पाटील व प्रा. योगिता काकड यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीची व कार्याची थोडक्यात माहिती दिली.

वर्धापन दिनानिमित्त महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांना भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच महाविद्यालयातील नोकरी मार्गदर्शन कक्षामार्फत ज्या विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या कंपन्यांत नियुक्ती झाली अशा ३५ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

वर्धापनदिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा, आर्ट आणि क्राफ्ट, चित्रकला इत्यादी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमास अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज भालेराव, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील, काकासाहेब देवधर इंग्रजी माध्यम शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील व सौ. प्रतिभा वैद्य, अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा. डॉ. रासने, प्रा. इंद्रजीत सोनवणे, प्रा. डॉ. योगिता आहेर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्वेता चोपडेकर यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. प्रियंका सोनवणे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

***

# विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

## तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक

**उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल म. जोशी**

**प्राचार्य : श्री. शरद कोठावदे**

### पालक शिक्षक संघ सहविचार सभा

दि. २६ जुलै २०२५ रोजी पालक शिक्षक सभेचे आयोजन करण्यात आले होते. उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत शै. वर्ष २०२५- २६ साठी पालक शिक्षक संघ उपाध्यक्षपदी श्री. कमलाकर चव्हाण, तसेच सहसचिवपदी सौ. राधिका धोंगडे यांची निवड करण्यात आली. श्री. चव्हाण आणि सौ. धोंगडे यांचा उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सभेत स्नेहसंमेलन, शालेय विद्यार्थ्यांसाठी बसची वेळ, शालेय शुल्क या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी श्री. मंथन वाळुंज यांनी इ. १०वी व इ. १२ वीच्या निकालाची सविस्तर माहिती उपस्थित पालकांना दिली. यावर पालकांनी आनंद व्यक्त केला. पालकांच्या विविध शंका व सूचनांवर प्राचार्य श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी विद्यालयात संस्थेमार्फत नवीन शैक्षणिक धोरणानुसार राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती पालकांना दिली. तसेच चित्रकला परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना विनामूल्य मार्गदर्शन करणारे सेवानिवृत्त प्राचार्य श्री. अशोक ढिवरे व विद्यालयास पाणी बॉटलची देणगी देणारे श्री. शरद पगार यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे संयोजन व सूत्रसंचालन श्री. मंथन वाळुंज यांनी केले.

### विद्यालयास ब्लूटूथ माइक सेट ची भेट

दि. २६ जुलै २०२५ रोजी विद्यालयातील उपशिक्षिका श्रीमती प्रतिभा बापूसाहेब ठाकूर यांनी त्यांचे वडील कै. बापूसाहेब ठाकूर यांच्या द्वितीय पुण्यस्मरणार्थ विद्यालयास रु. वीस हजार किमतीचा ब्लूटूथ माइक सेट भेट दिला. त्याचे अनावरण उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना श्री. अमोल जोशी यांनी श्रीमती प्रतिभा ठाकूर यांचे आभार मानले.

### संस्था कर्मचारीवृंदाची सदिच्छा भेट

दि. २६ जुलै २०२५ रोजी पुणे येथील संस्थेच्या मुख्य कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी विद्यालयास सदिच्छा भेट दिली. उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, प्राचार्य श्री. शरद कोठावदे, पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी या कर्मचाऱ्यांचे स्वागत केले. अतिथी कर्मचाऱ्यांनी विद्यालयातील विविध विभागांना भेटी दिल्या. उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी अतिथी कर्मचाऱ्यांना विद्यालयातील विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. कर्मचाऱ्यांनी विद्यालयाची प्रगती पाहून आनंद व्यक्त केला. यावेळी श्री. साहेबराव ठोंबरे, श्री. चेतन गोऱ्हे, सेवक श्री. पुंडलिक नहिरे व श्री. अजय सावंत उपस्थित होते.

### लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती

दि. १ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती संगीता कुवर यांनी केले. प्राचार्य श्री. शरद कोठावदे, पर्यवेक्षक श्री. संजय जोशी आणि शिक्षक प्रतिनिधी श्रीमती राजपूत यांनी प्रतिमेचे पूजन केले. विद्यार्थ्यांनी याप्रसंगी समायोचित भाषणे केली. श्रीमती सोनाली तुंगार यांनी लोकमान्य टिळकांची कथा मुलांना सांगितली. श्रीमती प्रीती राजपूत यांनी सूत्रसंचालन करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जीवन कार्य आणि त्यांना मिळालेले पुरस्कार याबद्दल माहिती सांगितली. उपस्थितांचे आभार श्री. गवळी यांनी मानले. याप्रसंगी समाज कल्याण कार्यालयातर्फे आलेल्या

श्रीमती सुजाता वाघमारे आणि श्रीमती नम्रता इंगळे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे पुस्तक शाळेला भेट म्हणून दिले.

### हळदी कुंकू समारंभ

दि. ५ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यालयात विद्यार्थिनींसाठी आणि माता पालक यांच्यासाठी हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती कुवर यांनी केले. हळदी कुंकवाचे महत्त्व आणि सणाची माहिती शिक्षक प्रतिनिधी श्रीमती राजपूत यांनी आलेल्या मातांना आणि विद्यार्थिनींना सांगितली. श्रीमती अमृतकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्वीकारले आणि अध्यक्षीय भाषण केले. याप्रसंगी श्रीमती शिवदे यांनी आलेल्या मातांचे विविध खेळ घेऊन मनोरंजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती राजपूत यांनी केले. आलेल्या माता पालक आणि विद्यार्थिनींना प्रसाद देण्यात आला. श्रीमती ठाकूर यांनी उपस्थितांचे आभार मानले. विद्यार्थ्यांनी आणि मातांनी खेळ, गाणी, नृत्य यांचा आनंद लुटला.

### हर घर तिरंगा अभियान

हर घर तिरंगा अभियान कालावधीत विद्यालयात संस्कृती समितीतर्फे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. चित्रकला स्पर्धा रांगोळी स्पर्धा आणि राखी बनवण्याच्या स्पर्धा घेण्यात आल्या विद्यार्थ्यांनी तिरंग्याचे चित्र व रांगोळ्या काढल्या. तांदळापासून, आगपेटीच्या काड्यांपासून विद्यार्थ्यांनी सुंदर राख्या बनवल्या.

### सैनिकांना राख्या भेट

ग्रंथपाल सौ. अर्चना गीत या दि. ४ ते १२ ऑगस्ट २०२५ या कालावधीत लेह लडाख येथे सहलीसाठी गेल्या असता विद्यालयातील विद्यार्थ्यांनी बनविलेल्या राख्या व भेटकार्ड, तसेच सैनिकांसाठी लिहिलेले पत्र सुरक्षेसाठी तैनात असणाऱ्या सैनिकांना सुपूर्द केले.

### रक्षाबंधन व आदिवासी दिन

दि. ९ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यालयात सामूहिक पद्धतीने विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला. दि. ९ ऑगस्ट २०२५ रोजी रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा, आदिवासी दिन व क्रांती दिनाची माहिती उपशिक्षिका श्रीमती कुवर यांनी विद्यार्थ्यांना सांगितली. प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवून आदिवासी दिनानिमित्त बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीमती प्रीती राजपूत यांनी केले. उपस्थितांचे आभार श्री. सुकदेव निंबेकर यांनी मानले

### स्वातंत्र्य दिन

दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यालयात ७९वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्राचार्य श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी गुलाब पुष्प देऊन सर्व मान्यवरांचे स्वागत केले. नर्मदा गोपालन संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रवीण नामदेव दाते यांनी विद्यालयातील इ. ५वी ते इ. १२वी या वर्गात गुणानुक्रमे प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी रोख रु. १०० चे पारितोषिक देऊन त्यांचा गौरव केला. यावेळी विद्यार्थ्यांनी पसायदान म्हटले. क्रीडा शिक्षक श्री. संजय गीते यांच्या मार्गदर्शनात देशभक्तीपर गीतांच्या तालावर विद्यार्थ्यांनी कवायतीचे विविध प्रकार सादर केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देताना उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी विद्यालय व संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या मेकिंग इंडिया या धोरणाचा उल्लेख करत सर्वांनी स्वदेशी वस्तू खरेदी करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्री. राजेंद्र जगताप, अमली पदार्थ विरोधी शपथ वाचन श्री. गणेश जाधव, पारितोषिक यादी वाचन श्री. चेतन गोऱ्हे यांनी केले. उपस्थितांचे आभार श्री. प्रशांत सूर्यवंशी यांनी मानले. ‘वंदे मातरम’ या राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण

दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी इन्फोसिस फाउंडेशनचे श्री. योगेश उंबरकर, सेवा सहयोग फाउंडेशनचे श्री. हर्षल झिलपे यांच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या वस्तुरूप देणगीतून विद्यालयातील इ. ५वीच्या विद्यार्थ्यांना ८६ दप्तरं, वह्या, हाताने तयार केलेले गुल्लक बचत बँक, सीड बॉल्स आणि कॅलिडोस्कोप, यांचे वितरण संस्थेचे कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, श्रीराम सदाशिव धामणकर अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज भालेराव, कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांच्या हस्ते करण्यात आले. सर्व अतिथींचे स्वागत प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांनी केले. यावेळी बोलताना प्रा. श्री ललित पाटील यांनी इन्फोसिस फाउंडेशन आणि, सेवा सहयोग फाउंडेशनच्या कार्याविषयी माहिती दिली. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून इन्फोसिस फाउंडेशन सेवा सहयोग फाउंडेशनचे देणगीसाठी विशेष प्रयत्न करणारे प्रा. श्री ललित पाटील, व प्रा. श्री. इंद्रजीत सोनवणे यांचे आभार मानताना उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी विद्यार्थ्यांनी मिळालेल्या साहित्याचा सुयोग्य उपयोग करून शैक्षणिक प्रगती साधण्याचे आवाहन केले. श्रीमती प्रीती राजपूत यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन केले. श्रीमती प्रतीक्षा गोकुळे यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमानंतर सर्व मान्यवरांनी ग्रंथालयास भेट दिली. ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांनी ग्रंथालयात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. अतिथींनी या उपक्रमांचे कौतुक केले.

**❊ विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक ❊**





**इन्फोसिस फाउंडेशन व सहयोग फाउंडेशनच्या वतीने इ. ५वीच्या विद्यार्थ्यांना शालेय दप्तर वाटप करताना कार्यवाह श्री. संजय गुंजाळ आणि उपकार्याध्यक्ष श्री अमोल जोशी, समवेत प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव, प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे आदी मान्यवर**



**दि. २६ जुलै २०२५ रोजी संस्थेच्या मुख्य कार्यालय, पुणे येथील कर्मचाऱ्यांनी तळेगांव अंजनेरी शाखेस भेट दिली. या प्रसंगी उपस्थित उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, प्राचार्य श्री. शरद कोठावदे**

# अभियांत्रिकी व एस.एस.धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. एम. व्ही. भालेराव**

## लोकमान्य टिळक जयंती उत्साहात साजरी

दि. २३ जुलै २०२५ रोजी महाराष्ट्रातील थोर व्यक्तिमत्त्व, धाडशीवृत्ती असणारे लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य प्रा. डॉ. एम. व्ही. भालेराव यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी उपस्थित सर्व विभाग प्रमुख, अकॅडेमिक डीन प्रा. डॉ. योगिता अहिरे, डॉ. सोनाली जाधव, ग्रंथपाल श्री. संदीप दराडे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. कोमल महाजन हिने केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना श्री. नंदकिशोर गोसावी यांनी लोकमान्य टिळक हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे आघाडीचे नेते होते. भारतातील तरूणांसाठी शिक्षणाचा दर्जा सुधारणे हे त्यांचे ध्येय होते असे सांगितले. कु. निकिता दळवी हिने सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी श्री. निवृत्ती डावखर आणि दीपाली रायते यांनी विशेष प्रयत्न केले.

## ''राष्ट्रीय मूल्य जागरूकता'' या विषयावर पोस्टर निर्मिती उपक्रम

''वैश्विक मानवीय मूल्य'' उपक्रम अंतर्गत ''राष्ट्रीय मूल्य जागरूकता'' या विषयावर पोस्टर निर्मिती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील विविध शाखांच्या सुमारे १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून ईमानदारी, सन्मान, नवीनता, समानता या विषयांवर पोस्टर बनवून सादर केले. संपूर्ण कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय मूल्यांची जाणीव निर्माण केली आणि या प्रकारे महाविद्यालयाने विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. या उपक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. ए. एस. जिंजर आणि प्रा. सुषमा पुंडे यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पोस्टर्सचे परीक्षण केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. एस. एन. भदाणे यांनी केले. या प्रसंगी सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. एस. एस. गोरे आणि प्रा. आर. सी. महाजन यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी विशेष प्रयत्न केले

## राष्ट्रीय ग्रंथालय दिवस उत्साहात साजरा

भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती म्हणून ''राष्ट्रीय ग्रंथालय दिवस'' साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थिनी कु. कोमल महाजन हिने केले. प्रा. राजेंद्र कडलग यांनी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जीवनाविषयी आणि त्यांच्या ग्रंथालय शास्त्रातील योगदानाबद्दल व पंचसूत्रांची माहिती दिली. कु. विशाखा राजपुरे हिने सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी श्री. निवृती डावखर आणि श्री. शुभम मुळे यांनी प्रयत्न केले.

***


## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.७.२०२५ ते ३१.७.२०२५**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी दर्शवित असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**
**(देणगी व्याजाचा विनियोग देणगी प्राप्त झाल्यानंतर पुढील वर्षापासून १५ वर्षांपर्यंत केला जातो.)**

देणगी रु. १०,००१/- वरील सर्व



शांताराम मोघे

●**नाव** - **श्री. संजीव शांताराम मोघे, पुणे**
**देणगी** - रु. ३,००,००१/-
**दिनांक** - २०.७.२०२५
**निमित्त** - कै. शांताराम सीताराम मोघे (मा. वि.) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत



सत्यभामाबाई आपटे


●**नाव** - **श्री. केशव कृष्णा आपटे, ठाणे**
**देणगी** - रु. १,००,०००/-
**दिनांक** - १७.७.२०२५
**निमित्त** - कै. श्रीमती सत्यभामाबाई कृष्णा आपटे यांचे स्मृतिदिनानिमित्त (ज्येष्ठ शुध्द ७)
**विनियोग** - देणगी व्याजाचा विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. सदाशिव निळकंठ वैद्य, मुंबई**
**देणगी** - रु. ५०,०००/-
**दिनांक** - १४.७.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

●**नाव** - **सरस्वती विनायक चॅरिटेबल ट्रस्ट श्री. अतुल विनोद व अरुण मधुकर आपटे, पुणे**
**देणगी** - रु. २५,०००/-
**दिनांक** - ९.७.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

●**नाव** - **श्रीमती सुमती पुरुषोत्तम कुंटे, ठाणे**
**देणगी** - रु. २०,०००/-
**दिनांक** - १४.७.२०२५
**निमित्त** - भगिनी कै. श्रीमती शांता पुरुषोत्तम कुंटे यांचे स्मृतिदिनानिमित्त (१८ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **श्री. अमेय सुरेंद्र पांगारकर, पुणे**
**देणगी** - रु. २०,०००/-
**दिनांक** - २.७.२०२५
**निमित्त** - कै. सुरेंद्र दिगंबर पांगारकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग शैक्षणिक मदत


वैभव नाईक

●**नाव** - **श्री. धैर्यशील कृष्णराव नाईक, पुणे**
**देणगी** - रु. १८,५००/-
**दिनांक** - ४.७.२०२५ व १५.७.२०२५
**निमित्त** - कै. वैभव कृष्णराव नाईक यांचे स्मृतिनिमित्त (४ जुलै - अल्पोपहार रु. ३,५००) व (१९ जुलै - भोजन रु. १५,०००)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अल्पोपहार व मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **श्री. अथर्व नीलेश पुराणिक, पुणे**
**देणगी** - रु. १७,०००/-
**दिनांक** - २२.७.२०२५
**निमित्त** - कै. विनायक रामचंद्र पुराणिक, कै. कमल विनायक पुराणिक, कै. आरती नीलेश पुराणिक यांचे स्मृतिदिनानिमित्त (१५ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **श्रीमती मंजुषा ऋषिकेश वढवेकर, मुंबई**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - २३.७.२०२५


ऋषिकेश वढवेकर

**निमित्त** - कै. ऋषिकेश गोविंद वढवेकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (१२ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **सौ. उर्मिला महादेव कलशेट्टी, पुणे**
**देणगी** - रु. १३,५००/-
**दिनांक** - ७.७.२०२५
**निमित्त** - कै. कमलाबाई लिंगाप्पा कलशेट्टी यांचे स्मृतिदिनानिमित्त (७ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **श्री. योगेश चिंतामणी दावलभक्त, पुणे**
**देणगी** - रु. १३,५००/-
**दिनांक** - ९.७.२०२५
**निमित्त** - कै. चिंतामणी अनंत दावलभक्त यांचे स्मृतिदिनानिमित्त (२७ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **श्री. अमोल बापू साळुंके, पुणे**
**देणगी** - रु. ११,०००/-
**दिनांक** - २३.७.२०२५


बापू दगडू साळुंके

**निमित्त** - वडील कै. बापू दगडू साळुंके यांचे स्मृतिदिनानिमित्त (१२ ऑक्टोबर)
**विनियोग** - देणगी व्याजाचा विनियोग अन्नदान


सलिल शिंगटे


●**नाव** - **सौ. सुनिता मोहन शिंगटे, पुणे**
**देणगी** - रु. १२,०००/-
**दिनांक** - २८.७.२०२५
**निमित्त** - कै. सलिल मोहन शिंगटे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२७ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ५,००१/- ते रु. १०,०००/-**



प्रवीण प्रदीप बेंद्रे

●**नाव** - **सौ. गौरी कृष्णाजी कुलकर्णी, पुणे**
**देणगी** - रु. ५,५००/-
**दिनांक** - ९.७.२०२५
**निमित्त** - कै. प्रवीण प्रदीप बेंद्रे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी रु. ५,०००/- च्या व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी ज्येष्ठ वद्य १४ रोजी अन्नदान व उर्वरित रु. ५००/- चा विनियोग व भाद्रपद वद्य १४ रोजी चालू वर्षासाठी अन्नदान

●**नाव** - **सौ. नूतन नितीन पोवळे, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - ९.७.२०२५


गजानन पोवळे

**निमित्त** - कै. गजानन बाळकृष्ण पोवळे (७.७.२०२६) कै. मंगला गजानन पोवळे (५.५.२०२६) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग अन्नदान


ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज

●**नाव** - **सौ. सुवर्णा प्रकाश जोशी, पुणे**
**देणगी** - रु. ५,००१/-
**दिनांक** - ९.७.२०२५
**निमित्त** - गुरूपौर्णिमेनिमित्त सदिच्छा देणगी (आषाढ शुध्द १५)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग मिष्टान्न


मीरा परांजपे

●**नाव** - **डॉ. मधुकर हरी परांजपे, पुणे**
**देणगी** - रु. ५,५००/-
**दिनांक** - २१.७.२०२५
**निमित्त** - पत्नी कै. डॉ. मीरा मधुकर परांजपे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२४ जुलै)
**विनियोग** - देणगी रु. ५,०००/- व्याज विनियोग अन्नदान, उर्वरित रु. ५००/- चा विनियोग चालू वर्षासाठी अन्नदान


यशवंत साने

●**नाव** - **सौ. राजश्री अविनाश बेलसरे, पुणे**
**देणगी** - रु. ५,००१/-
**दिनांक** - २५.७.२०२५
**निमित्त** - वडील कै. यशवंत गोपाळ साने यांचे स्मृतिदिनानिमित्त (श्रावण शुध्द ८)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **सौ. अनुराधा अरविंद ताविलदार, पुणे**
**देणगी** - रु. ६,४००/-
**दिनांक** - २५.७.२०२५
**निमित्त** - श्रावणी शनिवार निमित्त (२ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. उमेश पांडुरंग गोंगाणे, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - २९.७.२०२५
**निमित्त** - कै. पुष्पा पांडुरंग गोंगाणे यांचे स्मृतिदिनानिमित्त (५ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ४,००१/- ते रु. ५,०००/-**

●**नाव** - **श्री. बाळकृष्ण दत्तात्रेय उंडे, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - ८.७.२०२५
**निमित्त** - कै. दत्तात्रेय त्र्यंबक उंडे व कै. लक्ष्मीबाई दत्तात्रेय उंडे यांचे स्मृतिदिनानिमित्त (१० जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्रीमती सुलक्षणा अरविंद अभ्यंकर, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १४.७.२०२५
**निमित्त** - कै. अरविंद चिंतामण अभ्यंकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (१४ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. श्रीकृष्ण गजानन देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/- **दिनांक** - १६.७.२०२५
**निमित्त** - कै. सुशिला गजानन देशपांडे (श्रावण शुध्द १३) कै. गजानन बाळकृष्ण देशपांडे (श्रावण शुध्द २) यांचे स्मृतिदिनानिमित्त


सुशिला देशपांडे


गजानन देशपांडे

**विनियोग** - देणगी संपूण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ३,००१/- ते रु. ४,०००/-**

●**नाव** - **श्री. श्रीकांत नारायण तोडकरी, पुणे**
**देणगी** - रु. ३,५००/-
**दिनांक** - १४.७.२०२५
**निमित्त** - कै. नारायण तुकाराम तोडकरी यांचे स्मृतिदिनानिमित्त (२९ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. बालाजी गोविंद मोरे, पुणे**
**देणगी** - रु. ३,५००/-
**दिनांक** - २०.७.२०२५
**निमित्त** - कै. मंजुनाथ महाबळेश्वर हेगडे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२१ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. २,००१/- ते रु. ३,०००/-**

●**नाव** - **श्री. सुरेश कृष्णाजी भावे, पुणे**
**देणगी** - रु. २,५००/-
**दिनांक** - ३.७.२०२५
**निमित्त** - कै. कृष्णाजी नारायण भावे यांचे स्मृतिदिनानिमित्त (६ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **सौ. शुभदा पटवर्धन, मुंबई**
**देणगी** - रु. २,५०१/- **दिनांक**-१४.७.२०२५
**निमित्त** - कै. विमलाबाई पटवर्धन यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. विद्याधर चंद्रकांत उपाध्ये, पुणे**
**देणगी** - रु. ३,०००/-
**दिनांक** - १७.७.२०२५
**निमित्त** - आई कै. हेमलता चंद्रकांत उपाध्ये यांचे स्मृतिदिनानिमित्त (१७ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. देवीदास प्रभाकर रांगणेकर, मुंबई**
**देणगी** - रु. २,५००/-
**दिनांक** - १८.७.२०२५
**निमित्त** - कै. आई वडील, कै. सासू सासरे आणि दिवंगत आप्त यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. घनःश्याम दिगंबर केंजळे, पुणे**
**देणगी** - रु. ३,०००/-
**दिनांक** - २४.७.२०२५
**निमित्त** - कै. सौ. कलावती मारूती केंजळे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२४ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. १,००१/- ते रु. २,०००/-**


सुनिता केळकर

●**नाव** - **श्री. बळवंत रघुनाथ केळकर, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - ३.७.२०२५
**निमित्त** - कै. सौ. सुनिता बळवंत केळकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (३ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


शालिनी भोसले

●**नाव** - **श्री. सुरेश व अरविंद ज्ञानोबा भोसले, पुणे**
**देणगी** - रु. १,५०१/-
**दिनांक** - ४.७.२०२५
**निमित्त** - कै. शालिनी ज्ञानोबा भोसले यांचे स्मृतिदिनानिमित्त (५ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **सौ. विदुला योगेश मोघे, पुणे**
**देणगी** - रु. १,५००/-
**दिनांक** - ९.७.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शतायुभवन सभासदांना अन्नदान

●**नाव** - **श्री. यशवंत प्रभाकर दुनाखे, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - ११.७.२०२५
**निमित्त** - कै. जयंत प्रभाकर दुनाखे यांचे स्मृतिदिनानिमित्त (१६ जुलै)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग अन्नदान

●**नाव** - **सौ. भारती सतीश काळे, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - १६.७.२०२५
**निमित्त** - कै. यशवंत लक्ष्मण काळे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. प्रमोद माधव परांजपे, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/- **दिनांक**- २१.७.२०२५
**निमित्त** - आई कै. प्रभा माधव परांजपे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान



ॲड.एस.एन.चंद्रचूड

●नाव - ॲड. एस. एन. चंद्रचूड, पुणे
देणगी - रु. १,००१/-
दिनांक - २३.७.२०२५
निमित्त - प्रतिमहाप्रमाणे सदिच्छा देणगी
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●नाव - श्री. हेमंत बळवंत सैतवाडकर, पुणे
देणगी - रु. २,०००/-
दिनांक - २४.७.२०२५



बळवंत आणि उर्मिला सैतवाडकर

निमित्त - कै. बळवंत वासुदेव सैतवाडकर, कै. उर्मिला बळवंत सैतवाडकर, कै. संजीव बळवंत सैतवाडकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (आषाढ वद्य ३०)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कमेचा विनियोग शैक्षणिक मदत

●नाव - श्री. मधुसूदन वैद्य, मुंबई
देणगी - रु. १,१००/-
दिनांक - ३१.७.२०२५
निमित्त - वडिलांच्या पुण्यतिथीनिमित्त
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ५०१/- ते रु. १,०००/-**

●नाव - सौ. अपर्णा अरविंद मुजुमदार, पुणे
देणगी - रु. १,०००/-
दिनांक - १.७.२०२५
निमित्त - कै. सुमन श्रीधर आचार्य यांचे स्मृतिदिनानिमित्त (२ जुलै)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●नाव - श्री. अरविंद मोरेश्वर जोशी, पुणे
देणगी - रु. १,०००/-
दिनांक - ४.७.२०२५
निमित्त - कै. श्रीमती शांताबाई मोरेश्वर जोशी यांचे स्मृतिदिनानिमित्त (५ जुलै)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●नाव - श्री. देवेंद्र रमेश मेढेकर, पुणे
देणगी - रु. ५०१/-
दिनांक - ६.७.२०२५
निमित्त - कै. रमेश जनार्दन मेढेकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●नाव - श्री. जयंत वसंत देवधर, पुणे
देणगी - रु. १,०००/-
दिनांक - ८.७.२०२५
निमित्त - श्रीमती वासंती देवधर यांचे स्मृतिदिनानिमित्त (११ जुलै)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●नाव - सौ. मानसी मुकेश इनामदार, पुणे
देणगी - रु. १,०००/-
दिनांक - २४.७.२०२५
निमित्त - कै. वासुदेव विठ्ठल हर्डीकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (८ सप्टेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. मुकेश सिध्दीविनायक इनामदार, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - २४.७.२०२५
**निमित्त** - कै. सिध्दीविनायक इनामदार यांचे स्मृतिदिनानिमित्त (१ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


श्री. महादेव काटे

●**नाव** - **श्री. महादेव हनुमंत काटे, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - ३०.७.२०२५
**निमित्त** - कै. अनिल गोविंद घाणेकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (२८ जुलै)
**विनियोग** - देणगी पूर्वीच्या देणगीमध्ये समाविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्रीमती वैजयंती व्ही. दांडेकर, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - ३१.७.२०२५
**निमित्त** - कै. विजय पी. दांडेकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ५००/- खालील सर्व**

●**नाव** - **सौ. पुष्पा भुतडा, पुणे**
**देणगी** - रु. २५०/-
**दिनांक** - ३.७.२०२५
**निमित्त** - कै. नंदकिशोर भुतडा यांचे स्मृतिदिनानिमित्त (३ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. नवनाथ यशवंत शिर्के, पुणे**
**देणगी** - रु. १००/-
**दिनांक** - ९.७.२०२५
**निमित्त** - डॉ. कै. गुरूवर्य एम. कटकर (माधव हरी कटकर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्रीमती ललिता पटवर्धन, पुणे**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - ३०.७.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**वाढदिवसानिमित्त व विवाह वाढदिवसानिमित्त देण्यात आलेल्या देणग्या**

●**नाव** - **श्री. विकास एकनाथ डावरे, पुणे**
**देणगी** - रु. ७,०००/-
**दिनांक** - १.७.२०२५
**निमित्त** - चि. रविराज विकास डावरे याचे वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. सतीश साहेबराव धुमाळ, (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. ६,००१/-
**दिनांक** - ३१.७.२०२५
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान (३६५ दिवस भोजन व्यवस्था)

●**नाव** - **श्री. अनिरुध्द विनायक नातू, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १.७.२०२५
**निमित्त** - चि. शौनक अनिरुध्द नातू याचे वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


श्री. मधुकर देशमुख

**●नाव** - **श्री. मधुकर नरहर देशमुख, (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १७.७.२०२५
**निमित्त** - स्वत:च्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

**●नाव** - **श्री. रमेश नाफडे, पुणे**
**देणगी** - रु. ३,५००/-
**दिनांक** - ११.७.२०२५
**निमित्त** - नातू चि. अथर्व व चि. रोहन मिलिंद नाफडे यांचे वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न


श्री. उल्हास नाईक

**●नाव** - **श्री. उल्हास काळुराम नाईक, (मा. वि.) पुणे**
**देणगी** - रु. ३,४००/-
**दिनांक** - २३.७.२०२५
**निमित्त** - स्वत:च्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**●नाव** - **श्रीमती तुकाबाई बसप्पा वनकर, पुणे**
**देणगी** - रु. २,५००/-
**दिनांक** - ७.७.२०२५
**निमित्त** - चि. मंदार राजप्पा तेलंग याचे वाढदिवसानिमित्त (७ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**●नाव** - **सौ. सुजाता श्रीकांत घोरपडे, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - १५.७.२०२५
**निमित्त** - मुलगा चि. श्रीनिवास घोरपडे याचे वाढदिवसानिमित्त (२२ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


श्री. दत्तात्रय शिंदे

**●नाव** - **श्री. दत्तात्रय बजरंग शिंदे, (मा. वि.) पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - १.७.२०२५
**निमित्त** - स्वत:च्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग माजी विद्यार्थी निधीमध्ये समाविष्ट


ॲड. गणेश बहिरट

**●नाव** - **ॲड. गणेश अंगद बहिरट, (मा. वि.) पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - २५.७.२०२५
**निमित्त** - स्वत:च्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी व्याजाचा विनियोग माजी विद्यार्थी निधीमध्ये समाविष्ट

**●नाव** - **श्री. मारुती गुणाजी घडशी, पुणे**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - १.७.२०२५
**निमित्त** - चि. ओम नरेंद्र रेवाळे याचे वाढदिवसानिमित्त (११ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●नाव - श्री. प्रकाश विनायक वडनेरे, नाशिक
देणगी - रु. ५००/-
दिनांक - २२.७.२०२५
निमित्त - विवाह वाढदिवसानिमित्त
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

**वस्तुरूप देणगी अंदाजे मूल्य रु.**

- **श्री. उल्हास काळुराम नाईक, दापोडी, पुणे**
  स्वतःच्या वाढदिवसानिमित्त,
  लोकवन गहू १०० कि.,
  इंद्रायणी तांदूळ ५० कि., रु. ८,०००/-
- **श्री. गणेश बाबूराव मारणे (मा. वि.), पुणे**
  स्वतःच्या ४९ व्या वाढदिवसानिमित्त
  केळी ५० डझन, रु. २,५००/- ***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, घाटकोपर–मुंबई शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी** **कार्याध्यक्ष – श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**

**दि. २२.७.२०२५ ते २३.८.२०२५**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**



श्री.कृष्णाजी शिरकांडे

● **नाव** - **श्री. कृष्णाजी नारायण शिरकांडे, घाटकोपर, मुंबई**
**देणगी** - रु. १,००,०००/-
**दिनांक** - २३.७.२०२५
**निमित्त** - स्वतःच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त व अमृत महोत्सवीवर्षात पदार्पणानिमित्त
**विनियोग** - मुंबई शाखा वाढीसाठी

● **नाव** - **श्री. हर्ष ठक्कर, घाटकोपर (पू.), मुंबई**
**देणगी** - रु. २५,०००/-
**दिनांक** - २५.७.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क देण्यासाठी

● **नाव** - **श्रीमती नंदा राजेंद्र पोखरकर, (सहा. शिक्षिका) मुलुंड, मुंबई**
**देणगी** - रु. २५,०००/-
**दिनांक** - ३१.७.२०२५
**निमित्त** - सेवानिवृत्ती निमित्त
**विनियोग** - मुंबई शाखा वाढीसाठी

● **नाव** - **श्रीमती सुभलक्ष्मी विश्वनाथ, केरळ**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १४.८.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क देण्यासाठी

● **नाव** - **आचार्य अत्रे कट्टा, मुलुंड पूर्व शाखा हस्ते श्री. विजय जोशी व श्री. विजय मान, मुलुंड, मुंबई**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - २२.८.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - मुंबई शाखा वाढीसाठी ***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पंचवटी – नाशिक शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी** **उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल जोशी**

### माहे जून २०२५

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**

- **नाव - श्रीमती सिंधूताई सदाशिव धामणकर, नाशिक**

**देणगी** - रु. ५०,०००/-
**दिनांक** - ३.६.२०२५
**निमित्त** - पंचवटी शाखेच्या शताब्दीनिमित्त व कै. गंगुताई सदाशिव धामणकर यांचे जयंतीनिमित्त (दि. २२ जून)
**विनियोग** - देणगी व्याजाचा विनियोग वरील तारखेस आश्रमस्थ विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्यासाठी करण्यात आला.

- **नाव - सिसटोपिक लॅबोरेटरिज प्रा. लि., नवी दिल्ली**

**देणगी** - रु. ११,०००/-
**दिनांक** - १८.६.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यासाठी

- **नाव - श्री. शिवाजी रामा माळी, नाशिक**

**देणगी** - रु. ११,०००/-
**दिनांक** - १८.६.२०२५
**निमित्त** - पंचवटी नाशिक शाखेच्या शताब्दीनिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग संस्थावाढीसाठी करण्यात येईल.

- **नाव - श्री. विशाल नरेंद्र उपाध्याय, ठाणे**

**देणगी** - रु. २,०५१/-
**दिनांक** - १.६.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला. ***

**दुरुस्ती समाचार माहे जुलै २०२५ पृष्ठ क्र. ४७**

- **नाव - श्री. सुरेश प्रभाकर देखणे, (मा. वि.), नवी मुंबई**



प्रभाकर देखणे, कमल देखणे व विमल देखणे

**देणगी** - रु. १,२०,०००/-
**दिनांक** - १७.५.२०२५
**निमित्त** - वडील कै. प्रभाकर देखणे, मातोश्री कै. कमल देखणे व पत्नी कै. विमल देखणे यांचे पुण्यस्मरणार्थ
**विनियोग** - देणगी व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी दि. १८ जानेवारी रोजी आश्रमस्थ विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्यासाठी ***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पंचवटी – नाशिक शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी** **उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल जोशी**

## माहे जुलै २०२५

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**

- **नाव - श्री. तात्याभाऊ भागवत राऊत, नाशिक**

**देणगी** - रु. १२,०००/-
**दिनांक** - ७.७.२०२५
**निमित्त** - कै. बाळासाहेब भागवत राऊत यांचे पुण्यस्मरणार्थ
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्यासाठी करण्यात आला.



श्री. अमोल जोशी

- **नाव - श्री. अमोल मधुकर जोशी, (मा. वि.), नाशिक**

**देणगी** - रु. ५,००१/-
**दिनांक** - ३.७.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

- **नाव - श्री. बाळकृष्ण दत्तात्रय कुलकर्णी, नाशिक**

**देणगी** - रु. ५,००१/-
**दिनांक** - ६.७.२०२५
**निमित्त** - कै. स्वाती बाळकृष्ण कुलकर्णी यांच्या पुण्यस्मरणार्थ
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांना आषाढी एकादशी निमित्त फराळ (केळी व राजगिरा लाडू) देण्यासाठी करण्यात आला.

- **नाव - श्री. प्रमोद पुरूषोत्तम पुराणिक, नाशिक**

**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - २१.७.२०२५
**निमित्त** - पंचवटी नाशिक शाखेच्या शताब्दीनिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग संस्थावाढीसाठी करण्यात येईल.

- **नाव - श्री. एस. के. लिमये, पुणे**

**देणगी** - रु. ४,९००/-
**दिनांक** - २७.७.२०२५
**निमित्त** - कै. मंदाकिनी काशिनाथ लिमये यांच्या पुण्यस्मरणार्थ
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांना खिरीचे मिष्टान्न देण्यासाठी करण्यात आला.

- **नाव - श्री. विशाल नरेंद्र उपाध्याय, ठाणे**

**देणगी** - रु. २,२०२/-
**दिनांक** - १.७.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

- **नाव - श्रीमती विशाखाबेन दुलीपभाई घिया, मुंबई**

**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - १०.७.२०२५
**निमित्त** - कै. दुलीपभाई घिया यांच्या पुण्यस्मरणार्थ
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

- **नाव - सौ. लताबाई सूर्यकांत शहा, नाशिक**

**देणगी** - रु. १,८००/-
**दिनांक** - २९.७.२०२५
**निमित्त** - लग्नाच्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

- **नाव - श्री. बिहारीलाल अग्रवाल, नाशिक**

**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - २१.७.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

- **नाव - श्री. निनाद दिलीप नांदुर्डीकर, नाशिक**


**देणगी** - रु. ५०१/-
**दिनांक** - १७.७.२०२५
**निमित्त** - कै. वसंत शंकर भोसेकर यांच्या पुण्यस्मरणार्थ
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**वस्तुरूप देणगी मूल्य रु. अंदाजे**

श्री. निशांतजी शेठ, मुंबई, शिधा रु. ९३६८०/- ✻

## निधन वार्ता

✻ संस्थेचे देणगीदार, हितचिंतक व सल्लागार मंडळाचे सदस्य श्री. सुधाकर कुलकर्णी यांच्या मातोश्री सौ. विजया रंगनाथ कुलकर्णी यांचे दि. १३ ऑगस्ट २०२५ रोजी वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले.



देविदास शिंगटे

✻ संस्थेच्या अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे ९ येथील सेवक श्री. सुनील देविदास शिंगटे यांचे वडील श्री. देविदास माणिकराव शिंगटे यांचे दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले.



शकुंतला रेडेकर

✻ संस्थेचे संचालक श्री. सुनील पांडुरंग रेडेकर यांच्या मातोश्री श्रीमती शकुंतला पांडुरंग रेडेकर यांचे दि. २६ ऑगस्ट २०२५ रोजी वयाच्या ८३ व्या वर्षी वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले.

**ईश्वर त्यांचे आत्म्यास सद्‌गती देवो !**

✻✻✻

## * दि. १५ ऑगस्ट २०२५ स्वातंत्र्यदिन क्षणचित्रे *

संस्थेच्या पुणे, नाशिक, मुंबई, नवी मुंबई येथील विविध शैक्षणिक संकुलात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.


संस्था मुख्यालय, पुणे


विद्यानगरी, पर्वती, पुणे


तळेगांव अंजनेरी, नाशिक


घाटकोपर, मुंबई


म्हसरूळ, नाशिक

Postal Reg. No. PCW / 168 / 2023-2025, Office of Posting *Pune PSO *GPO 411 001*
[Publication Date 13.9.2025 Posting Date 15.9.2025]
SAMACHAR - Registered RNI No. 14546 / 1957. Decl. No. SDO / PUNE / SR / 74 / 2016
**License No. WPP - 56/2023-2025**




❊ अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे ९ ❊




नोएडा (दिल्ली) येथे झालेल्या स्पर्धेत 'सुप्रा रेसर कार डिझाईन व फॅब्रिकेशन टीम'ने राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळविला.
अखिल भारतीय प्रथम क्रमांक - रु. २,००,०००/-, ॲक्सेलरेशन इव्हेंट विजेता - रु. २५,०००/-,
स्किडपॅड इव्हेंट विजेता - रु. २५,०००/-, एंड्युरन्स इव्हेंटमध्ये प्रथम उपविजेता - रु. २०,०००/-

♦ पुणे विद्यार्थी गृह ♦

▣ पुणे शाखा - (०२०) २४४७०९२७, २४४७०५७३, २४४७९०५८
▣ मुंबई शाखा : (०२२) २५०६२३२२ फॅक्स : (०२२) २५०६४९३५ ▣ नवी मुंबई (नेरुळ) (०२२) २७७२३४१८
▣ नाशिक शाखा : (०२५३) २५११३०६ ▣ म्हसरुळ: (०२५३) २५३४२९१ ▣ तळेगाव अंजनेरी शाखा: (०२५९४)२२२२२७

कृपया आपल्या प्रतिक्रिया pvgsamachar@gmail.com या ई मेल वर नोंदवाव्यात.

**This monthly Samachar is printed on behalf of Pune Vidyarthi Griha by Printer and Publisher Mr. Subhash Mallappa Jirge at Maharashtra Mudranshala Chhapkhana, 1786, Sadashiv Peth, Pune 411030 and Published at Pune Vidyarthi Griha, 1786, Sadashiv Peth, Pune 411030.**
**Editor : Mr. Rajendra Vitthal Borhade**

समाचार हे मासिक पुणे विद्यार्थी गृह संस्थेकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे यांनी महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून पुणे विद्यार्थी गृह, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.
संपादक श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे